RNI 47034/64

# लातूर समाचार
LATUR SAMACHAR
Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

LATUR लातूर वर्ष ३४ वे अंक १६१ वा शनिवार, दिनांक १३ सप्टेंबर २०२५ (सांज. दैनिक) पोस्ट परवाना नं. L2/RNP/OMD-52/24-26 पृष्ठे – ६ मो:९४२२४७२५०२ किंमत १ रुपया

आमच्याकडे सर्व प्रकारचे कॉम्प्युटर, नायलॉन रबरी शिक्के एका तासात तयार करून मिळतील
संपर्क
जडे ऑफसेट प्रिंटर्स
मित्र नगर, लातूर, फोन : २४२६०८




# शांतीचा मार्ग स्वीकारा, मी तुमच्यासोबत : मोदी

## मणिपूरमध्ये हिंसाचाराच्या २ वर्षांनंतर पंतप्रधानांचा दौरा: सर्वाधिक प्रभावित चुराचांदपूरमध्ये रॅली

**इंफाळ/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवारी मणिपूरच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी चुराचंदपूरमध्ये ७,३०० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या अनेक विकास प्रकल्पांची पायाभरणी केली. कार्यक्रमाला संबोधित करताना पंतप्रधान म्हणाले – मी माझे डोके टेकवून मणिपूरला वंदन करतो. पंतप्रधान म्हणाले – माझ्या आयुष्यातील हा क्षण मी कधीही विसरू शकत नाही. मणिपूरच्या नावातच एक रत्न आहे, हे असे रत्न आहे जे येणाऱ्या काळात संपूर्ण ईशान्येची चमक वाढवेल. मी मणिपूरच्या जिद्दीला सलाम करतो.



पंतप्रधान दुपारी १२ वाजता इम्फाळ विमानतळावर पोहोचले. त्यानंतर रस्त्याने ६४ किलोमीटर प्रवास करून ते चुराचंदपूरला पोहोचले. पंतप्रधान हेलिकॉप्टरने इम्फाळहून चुराचंदपूरला जाणार होते, परंतु इम्फाळमध्ये मुसळधार पावसामुळे त्यांना रस्त्याने जावे लागले.

पंतप्रधान मणिपूरपूर्वी मिझोरमला गेले. तेथे त्यांनी ९००० कोटी रुपयांच्या प्रकल्पाची पायाभरणी केली आणि उद्घाटन केले. मे २०२३ मध्ये मैतेई आणि कुकी समुदायांमध्ये वांशिक हिंसाचार उफाळल्यानंतर पंतप्रधान मोदींचा मणिपूरचा हा पहिलाच दौरा आहे. २०१४ ते २०२२ दरम्यान त्यांनी ७ वेळा मणिपूरला भेट दिली. मणिपूरमध्ये हिंसाचार उसळल्यानंतर, विरोधी पक्ष सतत पंतप्रधान मोदींनी मणिपूरला भेट देण्याची मागणी करत होते. काँग्रेसने आता पंतप्रधानांच्या या भेटीचे स्वागत केले आहे. काँग्रेस खासदार राहुल गांधी शुक्रवारी म्हणाले, 'मणिपूरची समस्या बऱ्याच काळापासून सुरू आहे, ते आता तिथे जात आहेत हे चांगले आहे.'

पंतप्रधान म्हणाले– मणिपूरमध्ये आशा आणि आत्मविश्वासाची एक नवी पहाट उजाडत आहे

पंतप्रधान म्हणाले– मणिपूर ही आशा आणि अपेक्षांची भूमी आहे. दुर्दैवाने, या अद्भुत भागात हिंसाचाराने थैमान घातले होते. काही काळापूर्वी, मी मदत छावण्यांमध्ये राहणाऱ्या बाधित लोकांना भेटलो. त्यांना भेटल्यानंतर, मी असे म्हणू शकतो की मणिपूरमध्ये आशा आणि आत्मविश्वासाची एक नवी पहाट उजाडत आहे.

# खा. चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत रविवारी भाजपा कार्यकर्त्यांचा संकल्प मेळावा

**लातूर/प्रतिनिधी :** भारतीय जनता पार्टी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या वतीने भाजपाचे नुतन जिल्हाध्यक्ष यांचा जाहीर सत्कार आणि मतदार संघातील कार्यकर्त्यांचा संकल्प मेळावा राज्याचे माजी मुख्यमंत्री खा. आशोकराव चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत येत्या १४ सप्टेंबर २०२५ रविवार रोजी आयोजीत करण्यात आला असून या कार्यक्रमास हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे अवाहन संयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.





भारतीय जनता पार्टीचे लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी माजी मंत्री बस्वराज पाटील मुरूमकर आणि लातूर शहर जिल्हाध्यक्षपदी अजितसिंह पाटील कव्हेकर यांची नुक्तीच प्रदेश भाजपा पक्षश्रेष्ठीच्या वतीने निवड करण्यात आली असून त्यांचा लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या वतीने राज्याचे माजी मुख्यमंत्री भाजपाचे नेते खा. आशोकराव चव्हाण यांच्या शुभहस्ते जाहीर सत्कार करण्यात येणार असून या सत्कार सोहळयाच्या निमित्ताने लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपा कार्यकर्त्यांचा भव्य संकल्प मेळावा आयोजीत करण्यात आला आहे.

संकल्प मेळावा आणि सत्कार सोहळा या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड हे भुषविणार आहेत. तर यावेळी राज्य कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष श्री. पाशा पटेल, जिल्हायाचे माजी पालकमंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, औसा विधानसभेचे आ. अभिमन्यू पवार, गोपीनाथ मुंडे ऊस तोड कामगार मंडळाचे अध्यक्ष श्री. गोविंद अण्णा केंद्रे, माजी आमदार श्री. शिवाजीराव पाटील कव्हेकर, भाजपा नेत्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, माजी जिल्हाध्यक्ष श्री. दिलीपराव देशमूख यांच्यासह इतर अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

सदरील संकल्प मेळावा आणि सत्कार सोहळा येत्या १४ सप्टेंबर २०२५ रविवार रोजी दुपारी ३ वाजता लातूर येथील विश्व पॅलेस मंगल कार्यालयात होणार असून या मेळाव्यास लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपाचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्ते बंधू भगिनींनी बहूसंख्येनी उपस्थित राहावे असे आवाहन मतदार संघातील भाजपाचे मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले, प्रताप पाटील, सुरज शिंदे, शरद दरेकर आणि उध्दव काळे यांनी केले आहे.

# मराठा आरक्षणावर पुढील सुनावणी ४ ऑक्टोबरला



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात २८ टक्के मराठा समाज आहे. यातील २५ टक्के समाज हा गरीब आहे, असे सरकारच्य वतीने महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी सांगितले.

**कोणते आरक्षण ठेवायचे याचा निर्णय घेतला आहे का?**

तुम्हाला आता दोन आरक्षण आहेत. त्यामुळे राज्य सरकारने कोणते आरक्षण कायम ठेवायचे याचा निर्णय घेतला आहे का? अशी विचारणा न्या. रवींद्र घुगे यांनी यावेळी केली. यावरकाही पात्र मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. मराठा समाज मागास नाही, असा युक्तीवाद प्रदीप संचेती यांनी केला.

मराठा समाजाला देण्यात आलेल्या १०% आरक्षणावर मुंबई उच्च न्यायालयात आज (दि. १३) सुनावणी सुरु आहे. न्यायमूर्ती रवींद्र घुगे, न्यायमूर्ती एन जे जमादार आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठासमोर आरक्षणाच्या समर्थनार्थ तसेच विरोधात दाखल झालेल्या याचिकांवर दिवसभर युक्तिवाद ऐकून घेणार आहेत.

# जयक्रांती सेमी इंग्लिश स्कूल मध्ये स्वयंशासन दिन उत्साहात साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** जयक्रांती सेमी इंग्लिश स्कूल लातूर मध्ये इयत्ता दहावी च्या विद्यार्थ्यांचा स्वयंशासन दिन साजरा करण्यात आला. शिक्षक दिनाचे औचित्य साधून मुख्याध्यापक पर्यवेक्षक, लिपिक,सेवक व शिक्षकांचे कामकाज कसे चालते याची जाणीव व्हावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये वैष्णवी बिरादार हिने मुख्याध्यापक म्हणून जबाबदारी सांभाळली. पर्यवेक्षक मधुर पारेकर, लिपिक आयुष सिंधीकुमठे,सेवक शेख अख्तर अली,वर्गशिक्षक, कल्पना महानुरे,आवंती सोनटक्के,श्रावणी माकणे,संग्राम सवासे, विष्णु यादव,संदेश वाघमारे,पीयुष कुलकर्णी यांनी काम पाहिले. प्रत्यक्ष काम करताना येणाऱ्या समस्या काय असतात त्या



कशा सोडवायच्या वर्गअध्यापन कसे करावे , वर्ग नियंत्रण कसे ठेवावे, हजेरी कशी असते, काय नोंदी असतात, प्रशासनातील महत्वाच्या जबाबदाऱ्या काय असतात या सर्व बाबींचा विद्यार्थ्यांनी प्रत्यक्षात अनुभव घेतला व अध्यापनाचा आनंद घेतला. या साठी प्राचार्य प्रशांत घार पर्यवेक्षक तानाजी घाटके व दहावी प्रमुख नंदकिशोर माळी यांचे मौलाचे मार्गदर्शन लाभले. स्वयंशासन दिन यशस्वी होण्यासाठी गिरीष रंदाळे,डॉ गणपत माने,डॉ सुशिल शिंदे, संभाजी वारकड, विश्वनाथ सिंधीकुमठे, अमर येळंबकर, संगमेश्वर भेंडेगावे,रामदास लातूरे, गजानन घोंगडे, संकेत बनसोडे, नितीन दाडगे, नीता तांबाळे, तुलसी तपसाळे, रंजना राशिनकर, गीता पाटील, अश्विनी कल्लेकर मॅडम, आकाश लोहार आदिनी परिश्रम घेतले.

# राज्यस्तरीय वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा दयानंद कला महाविद्यालयात उत्साहात

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद कला महाविद्यालय, लातूर व शिक्षणाधिकारी योजना विभागाच्या वतीने उल्हास नवभारत साक्षरता उपक्रमांतर्गत राज्यस्तरीय वक्तृत्व माझ्या स्वप्नातील साक्षर भारत व डिजिटल साक्षरता – काळाची गरज की अतिरिक्तओझे वादविवाद या स्पर्धेचे आयोजन वरील विषयावर उपप्राचार्य डॉ दिलीप नागरगोजे यांनी केले होते

या स्पर्धेचे उद्घाटन शिक्षणाधिकारी योजना विभागाच्या अधिकारी तृप्ती अंधारे यांच्या हस्ते झाले. त्यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले की, उल्हास नवभारत साक्षरता हा भारत सरकारचा स्तुत्य उपक्रम असून प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एका व्यक्तीला साक्षर करणे ही काळाची गरज आहे. संगणक साक्षरता व सोशल मीडियाची ओळख जेष्ठ नागरिकांना करून देणे हेही समाजाप्रती आपले कर्तव्य आहे.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड म्हणाले की, वक्तृत्व व वादविवाद या महत्त्वाच्या कला आहेत. त्यातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो.

या स्पर्धेसाठी मुंबई, नाशिक, सोलापूर, धाराशिव, उदगीर, अहमदपूर, औसा व लातूर येथिल कनिष्ठ महाविद्यालयांमधून १०४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांनी केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, डॉ. प्रशांत दीक्षित उपस्थित होते तर परीक्षक म्हणून डॉ. गोपाल बाहेती, डॉ. सुधीर गाढवे, प्रा. दशरथ ननवरे, प्रा. महेश जंगापल्ले, प्रा. रत्नाकर केंद्रे, प्रा. विजय गवळी, प्रा. सुवर्णा कारंजे, प्रा. अरुण धायगुडे व प्रा. प्रवीण जाहुरे,प्रा अनिल भुरे आदी उपस्थित होते.

विजेते विद्यार्थी

वक्तृत्व स्पर्धा :

प्रथम – पौर्णिमा मस्के (दयानंद कला महाविद्यालय, लातूर)

द्वितीय – जान्हवी कर्डिले (राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर)

तृतीय (विभागून) – सायली कुलकर्णी (महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर) व श्रविका जाधव (राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर)

वादविवाद स्पर्धा :

प्रथम – जान्हवी कर्डिले व सेजल पाटील (राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर)

द्वितीय – सुदर्शन कचोलीया व सतीश चव्हाण (दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर)

तृतीय – कोमल घेरे व सलीम शेख (हावगी स्वामी महाविद्यालय, उदगीर) जानवी काळे व एकता पुरोहित (दयानंद कला लातूर)

यशस्वी विद्यार्थ्यांना रोख रक्कम , प्रमाणपत्र शिल्ड देऊन गौरविण्यात आले.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



राज्यात पावसाचा जोर वाढणार...



## चिमटा दयाचा

कत्ती–कोयत्याची दहशत वेळीच रोखली गेली ! वाईट प्रवृत्तीस वेळीच बंदोबस्ताची गरज निर्माण झाली !!

# मुख्यमंत्री पंचायत राज समृध्द अभियान

## तालुकास्तरीय प्रशिक्षण व जनजागृती कार्यशाळा

**निलंगा/आयुब बागवान :–** मुख्यमंत्री पंचायत राज समृध्द अभियान सन २०२५–२०२६ अंतर्गत सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामरोजगार सेवक, संगणक परिचालक, इ.ची तालुकास्तरीय प्रशिक्षण व जनजागृती कार्यशाळा डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर सांस्कृतिक सभागृह निलंगा येथे पार पडली.




सदर कार्यशाळेसाठी माजी जिल्हा परिषद सभापती श्रीमती. भारतबाई सोळुंके जि.प.लातूर, श्री. दगडु वाघमारे माजी जि.प. सदस्य, श्री. धोंडीराम बिराजदार सोळुंके चेअरमन, श्री. संतोष वाघमारे माजी जि.प.सदस्य, श्री.वामन भालके माजी पं.सदस्य, श्री. कुमोद लोभे, श्री. सुरेश बिराजदार इ. सन्माननीय उपस्थित होते.

सर्वप्रथम श्री. सोपान अकेले गटविकास अधिकारी पपंचायत समिती निलंगा यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत पुष्पगुच्छ देवुन केले. तसेच श्री. दत्ता खटके यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यानंतर श्री. संजय आडे,श्री एजाज मौजन यांनी विषयांचे अनुषंगाने सखोल व सविस्तर मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमात श्री. सोपान अकेले गट विकास अधिकारी पंचायत समिती निलंगा यांनी सदरील अभियानाची उदिष्टे व, भुमिका व जबाबदा–या या विषयी मार्गदर्शन केले. तसेच सदर कार्यशाळेत नंतर ग्रामपंचायत स्तरावर ग्रामस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करणेबाबत नियोजन करणेबाबत सांगीतले.

सदर कार्यशाळेसाठी पंचायत समितीचे सर्व विभागप्रमुख, विस्तार अधिकारी (सर्व), शाखा अभियंता (सर्व) व ग्रामपंचायत अधिकारी (सर्व), सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य ग्रामरोजगार सेवक, संगणक परिचालक इ. कर्मचारी/लोकप्रतिनिधी हजर होते.

सदर कार्यक्रम यशस्वी करणेसाठी श्री. मोहळकर बालाजी क.प्र. अधि., श्री. सुर्यवंशी आर.एच. व श्री. बळवंते एस.ए.वि.अ.पं., श्री. गणेश कुलकर्णी व.सहा., इ. कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांच्या एकत्रित प्रयत्नामुळे अपेक्षित यश मिळेल–सूर्यवंशी

**लातूर/प्रतिनिधी :** जेएसपीएम संस्थेअंतर्गत येणार्या स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालयाच्यावतीने विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी अनेक प्रयत्न केले जातात. अनेक शिष्यवृत्ती परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना बसवून गुणवत्तेचा लातूर पॅटर्न जपण्याचे काम गेल्या अनेक वर्षापासून केले जात आहे. त्यामुळे यापुढील कालावधीतही विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांच्या एकत्रित प्रयत्नातून संस्थेला अपेक्षित यश मिळेल असा विश्वास स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजी सूर्यवंशी यांनी व्यक्त केला.

यावेळी ते जेएसपीएम संस्थेच्या स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालयात विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांच्या चर्चासत्रात बोलत होते. यावेळी या कार्यक्रमाला सोनाली पाटील, शितल वाडीकर, माधव गित्ते, शुभांगी बेरुळे आणि ज्योती राजूरे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना मुख्याध्यापक शिवाजी सूर्यवंशी म्हणाले की, या चर्चासत्राच्या माध्यमातून शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी कशी करून घ्यावी, परीक्षेसाठी असलेल्या गुणांची विभागणी कशी आहे, कोणत्या घटकावर अधिक लक्ष केंद्रीत करणे गरजेचे आहे, मुले घरी अभ्यास करताना पालकांशी कशी काळजी घ्यावी, त्यांना अभ्यासासाठी प्रोत्साहन व मार्गदर्शक कसे करावे. याबाबत सविस्तर माहिती देऊन या चर्चासत्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेला सक्षमपणे सामोरे जावे. असे आवाहनही मुख्याध्यापक शिवाजी सूर्यवंशी यांनी यावेळी बोलताना केले.कार्यक्रमाच्या प्रारंभी संयोजन समितीच्यावतीने प्रमुख मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## नेपाळमधील घटनेकडे गांर्भीयाने पाहावे लागेल

नेपाळ हा देश भारतालगत आहे. जाणे-येणे सहज होत असते. त्याच प्रमाणे भारतात हिवाळ्यात नेपाळी गरम वस्त्र घेऊन विक्रीसाठी भारतात भ्रमण करीत असतात. मोठा व्यवसाय तीन महीण्यात केला जातो. अतिषय मवाळ असणारे लोक उद्रेक करू शकतील असे वाटत नव्हते. तरी तरूणांनी अतिषय छुल्लक कारणावरून मोठे कृत्य केले आहे. या घटनमुळे शंका निर्माण होणे स्वाभाविक आहे. नेपाळी असा उद्रेक करू शकतील असे वाटत नसताना संसदेवर हल्ला केला असून पंतप्रधानांना पायउतार व्हावे लागले. अनेकांना राजीनाम द्यावा लागला आहे. कारण तसे भयाण नव्हते. खायला अन्न नाही किंवा दुष्काळसदृश्य परिस्थिती नाही. केवळ सोशल मिडीयावर बंदी घातली. ती विचारविनिय करून पुन्हा चालू करता आली. असा स्थितीत एवढ हिंसक उद्रेकाची गरज नव्हती. सोसलमिडीया बंद केला म्हणजे जीवनात मोठे नुकसान होणार नव्हते. या हिंसक उद्रेकामागे परदेशिय शक्तीचा हात असल्याचा संशय निर्माण होणे स्वाभाविक आहे. नेपाळ जसा भारताच्यासीमावर्ती भाग आहे तसे बांगलादेश, प.बंगालचा प्रांत, काही बिहारचा भाग येतो. जसे हिंसकता कट्टरता बांगलादेशात घडली तशीच नेपाळ मध्ये घडल्याने इतर ठिकाणी परिणाम होण्याची शक्यता आहे. कट्टरता ज्यावेळी निर्माण होते, त्यावेळी हिंसकता निर्माण होते. नेपाळमध्ये घडलेली घटना केवळ छुल्लक कारण असले तरी त्याचा परिणाम शेजारी राष्ट्रावर होण्याची शक्यता आहे. नेपाळ तसा सांस्कृतिकदृष्ट्या जवळचा, ऐतिहासिकदृष्ट्या बांधलेला आणि आर्थिकदृष्ट्या परस्परावलंबी असा देश आहे. हिमालयाच्या कुशीत वसलेला हा राष्ट्रराज्य भौगोलिकदृष्ट्या लहान असला तरी, त्याचे राजकीय व सामाजिक घडामोडी भारतासाठी अत्यंत महत्त्वाच्या ठरतात. भारत आणि नेपाळ यांच्यातील १,७५१ किलोमीटर लांबीची खुली सीमा, धार्मिक नातेसंबंध, स्थलांतरित कामगार, व्यापार-उद्योग, सुरक्षा व कूटनीती या सर्व बाबीमुळे नेपाळमधील घडामोडींचे परिणाम भारतावर थेट उमटतील. गेल्या काही दशकांत नेपाळमध्ये राजकीय उलथापालथ, संविधानिक बदल, राजेशाहीची समाप्ती, माओवादी बंड, शेजारी राष्ट्रांचा प्रभाव, पायाभूत सुविधांवरील गुंतवणूक, तसेच चीन-भारत स्पर्धा अशा अनेक महत्त्वाच्या घटना घडल्या. या प्रत्येक घटनेचे भारतावर वेगवेगळे परिणाम झालेले आहेत. नेपाळमधील राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सामरिक घडामोडींचे भारतावर परिणाम होवू शकते. नेपाळ व भारत यांचे नाते हजारो वर्षे जुने आहे. भगवान गौतम बुद्धाचा जन्म लुंबिनी (नेपाळ) येथे झाला, तर भगवान रामाशी संबंधित जनकपुर (सीता जन्मभूमी) देखील नेपाळात आहे. त्यामुळे धार्मिक आणि सांस्कृतिक देवाण-घेवाण फार मोठ्या प्रमाणात आहे. त्याचप्रमाणे नेपाळातील लोक वाराणसी, गोरखपूर, आयोध्या इत्यादी ठिकाणी मोठ्या संख्येने जातात. परिणाम: या सांस्कृतिक नात्यामुळे दोन्ही देशांतील संबंध नेहमी भावनिक पातळीवर मजबूत राहिले. त्यामुळे राजकीय तणाव जरी निर्माण झाला तरी जनतेतील आपुलकीचा धागा कायम राहतो. २००८ मध्ये नेपाळमध्ये दीर्घकाळ टिकलेल्या राजेशाही व्यवस्थेचा अंत झाला आणि प्रजासत्ताक संविधान लागू झाले. भारताने लोकशाही प्रक्रियेला पाठिंबा दिला, परंतु नेपाळमधील अस्थिर राजकारणामुळे भारतावर राजनैतिक दबाव निर्माण झाला. वारंवार बदलणारे पंतप्रधान, अंतर्गत कलह आणि सत्तासंघर्ष यामुळे भारताच्या गुंतवणुकीला व व्यापाराला धोके निर्माण झाले. परिणाम: भारताला नेपाळातील प्रत्येक सत्ताबदलाशी जुळवून घ्यावे लागले. नेपाळातील अस्थिरता सीमाभागात असुरक्षिततेचे वातावरण निर्माण करत राहिली. नेपाळातील माओवादी चळवळ (१९९६-२००६) ही हिंसक व दीर्घकाळ चाललेली होती. या काळात भारत-नेपाळ सीमेवरून शस्त्रांची व घुसखोरीची हालचाल वाढली. भारतीय माओवादी संघटनांना (नक्षलवादी) नेपाळातील घटनांनी प्रेरणा मिळाली. परिणाम: भारतातील छत्तीसगड, झारखंड, महाराष्ट्र व ओडिशा येथे कार्यरत नक्षलवाद्यांना नेपाळातील चळवळीने मानसिक बळ मिळाले. त्यामुळे भारताने नेपाळातील शांतता प्रक्रियेला सक्रीय पाठिंबा दिला. भारत-नेपाळ सीमेवरून अनेक वाद उद्भवले आहेत, विशेषतः कालापानी, लिपुलेख आणि लिम्पियाधुरा भागावरून. नेपाळ सरकारने २०20 मध्ये नकाशा बदलून या भागांना आपल्यात दाखवले. भारताने याला विरोध दर्शवला. सीमावादामुळे दोन्ही देशांत तणाव वाढला. चीनने या परिस्थितीचा फायदा घेत नेपाळमध्ये आपला प्रभाव वाढवण्यास सुरुवात केली. भारताला आपल्या सीमेवरील सुरक्षा यंत्रणा अधिक मजबूत करावी लागली. नेपाळ हे भारत व चीन यांच्यातील सामरिक बफर स्टेट आहे. चीनने पायाभूत सुविधांमध्ये, रस्ते, रेल्वे, धरणे व जलविद्युत प्रकल्पांमध्ये नेपाळात मोठी गुंतवणूक केली. भारताची नेपाळमधील पारंपरिक पकड कमी होण्याची शक्यता. नेपाळात चीनच्या प्रभावामुळे भारताच्या सुरक्षा व परराष्ट्र धोरणावर दबाव. भारताला नेपाळातील पायाभूत सुविधा व व्यापार गुंतवणुकीत आपला वाटा वाढवावा लागला. आर्थिक संबंध व व्यापारभारत हा नेपाळचा सर्वात मोठा व्यापार भागीदार आहे. नेपाळचा सुमारे ६0% आयात व ४0% निर्यात भारताशीच होते. लाखो नेपाळी नागरिक भारतात रोजगारासाठी येतात. भारतीय बाजारपेठ नेपाळसाठी जीवनरेखा ठरते. नेपाळातील आर्थिक धोरणातील बदल भारतातील रोजगार व व्यवसायांवर थेट परिणाम करतात. भारतीय रुपयाशी नेपाळी रुपयाचे नाते असल्याने आर्थिक स्थैर्यावर भारताचा प्रभाव राहतो. अंदाजे ३०-४० लाख नेपाळी नागरिक भारतात विविध क्षेत्रांत काम करतात असा अंदाज आहे. शेजारी राष्ट्राचा परिणाम काही प्रमाणात भारतावर होऊ शकतो.

# महिला सक्षमीकरणासह जलसंधारणाची वाटचाल स्वयंम् शिक्षण प्रयोग संस्थेच्या पुढाकाराने पाणी संवर्धन जनजागृती कार्यशाळा

**निलंगा/आयुब बागवान:** ''पाणी वाचवा जीवन वाचवा'' या हाकेला प्रतिसाद देत निलंगा तालुक्यातील स्वयंम् शिक्षण प्रयोग संस्थेच्या वतीने, ॲक्सिस बँक फाउंडेशनच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या स्वावलंबन प्रकल्पा अंतर्गत आज दिव्यांका मंगल कार्यालय निलंगा येथे पाणी संवर्धन जनजागृती कार्यशाळा उत्साहात पार पडली.

या प्रकल्पाअंतर्गत निलंगा तालुक्यातील १०० गावांमध्ये सेंद्रिय शेती, शेतीपूरक व्यवसाय, कौशल्य विकास, व्यवसायिकता आणि पाणी संवर्धन या विषयांवर सातत्याने प्रशिक्षण दिले जाते. या माध्यमातून ग्रामीण महिलांना आत्मनिर्भर बनवून महिला सक्षमीकरणाची नवी दिशा दाखवली जात आहे. ४५ गावांचा सहभाग झाला असून ५७५ लोक उपस्थित होते

कार्यशाळेत निलंगा तालुक्यातील ४५ गावांमधून ग्रामसेवक, ग्रामपंचायत अधिकारी, सरपंच-उपसरपंच, कृषी सहाय्यक, आदर्श शेतकरी आणि स्वावलंबन सखी अशा ५७५ लोकांनी सहभाग नोंदविला.

ग्रामपंचायत, शासन आणि लोकसहभाग यांच्या साहाय्याने गाव पातळीवर प्रभावी पद्धतीने पाणी संवर्धनाचे कार्य राबविण्याचा निर्धार यावेळी सर्वांनी व्यक्त केला.

महिलांच्या स्वावलंबनाचे प्रतीक

कार्यशाळेत अनेक शेतकरी महिलांनी लघु उद्योगातून बनवलेले पापड आणि गृहपयोगी साहित्य विक्रीसाठी आणले होते, यामुळे महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाबरोबरच स्थानिक उत्पादन व पोषणमूल्यांना प्रोत्साहन मिळाले. महिलांचा हा सहभाग ''शेतातून स्वयंपूर्णतेकडे'' या संकल्पनेला उजाळा देणारा ठरला.

तज्ज्ञांचे मार्गदर्शन पाणी संवर्धनाची नवी दिशा कार्यशाळेत उपस्थित तज्ज्ञांनी पाणी संवर्धनासाठी ठोस उपाय सुचवले. श्री. दिलीप बिराजदार(उद्योग निरीक्षक ) श्री. राहुल गाडे (महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा व्यवस्थापक)



श्री.डॉ. चिलमे सर(पशुधन अधिकारी निलंगा ) श्री सुरवंशी एस व्ही .(पशुधन पर्वक्षेक )धनंजय पवार (जिल्हा संसाधन अधिकारी लातुर)यांनी शासनाच्या योजना व शेतकऱ्यांचा सक्रिय सहभाग या विषयावर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती संदया गायकवाड यांनी केले. तसेच विशेष म्हणजे प्रवीण राठोड यांनी त्यांच्या शैलीतुन विविध नेते व अभिनेते यांच्या आवाजात पाणी संवर्धनाविषयीचा संदेश दिला. या वेगळ्या शैलीतील प्रस्तुतीमुळे उपस्थित शेतकरी, महिला व ग्रामस्थ यांना जनजागृतीचा संदेश अधिक प्रभावीपणे पोहोचला. कार्यक्रमाचे आयोजन व आभार

कार्यक्रमाची प्रस्तावना तथा प्रकल्पाची व संस्थेची ओळख प्रकल्प समन्वयक श्री. दीपक लांडगे यांनी दिली.

या कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यासाठी श्री. पांडुरंग धडे (पाणलोट समन्वयक) , सुनील काळुंके,मनीषा सोनूले,अविनाश कळसे, पवन कदम यांनी विशेष परिश्रम घेतले.

स्वयंम् शिक्षण प्रयोग ही संस्था गेल्या अनेक वर्षांपासून ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी कार्यरत आहे. महिलांना कौशल्य प्रशिक्षण, लघुउद्योग, शेतीपूरक व्यवसाय व सामाजिक जनजागृती या क्षेत्रांत संधी उपलब्ध करून देऊन त्यांना आत्मनिर्भरतेकडे नेले जात आहे.

आजची पाणी संवर्धन कार्यशाळा या ध्येयाशी घट्ट जोडलेली आहे, कारण ''पाणी वाचवले तरच समाज व शेती वाचेल आणि शेती वाचली तरच महिलांचे व कुटुंबाचे स्वावलंबन बळकट होईल.''

या कार्यशाळेमुळे निलंगा तालुक्यात पाणी संवर्धनाची चळवळ अधिक बळकट झाली असून, महिला सक्षमीकरणासह ग्रामस्थांच्या लोकसहभागातून गावोगावी जलक्रांती घडविण्याचा विश्वास व्यक्त होत आहे.

## दयानंद वाणिज्यमध्ये ३२ दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न; विद्यार्थ्यांमध्ये कौशल्ये वाढविण्यासाठी प्लेसमेंट सेल चा पुढाकार

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या करिअर गाईडन्स ॲण्ड प्लेसमेंट विभागातर्फे बी.कॉम., बीबीए या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी बजाज सीपीबीएफआय कंपनीच्या माध्यमातून ३२ दिवसीय कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत एकूण ४३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांसाठी विविध ॲक्टिव्हिटीज, स्किल डेव्हलपमेंट सत्रे तसेच मॉक इंटरव्ह्यूचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेत डॉ.नितीन बुर्ला, विक्रांत गिरवलकर, धवल कुमार, शार्दुल शिरोलकर, मृणाल खडक्कर यांनी मार्गदर्शन केले. सॉफ्ट स्किल्स, पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट ,आयटी व तांत्रिक कौशल्ये, इंग्रजी भाषेचे प्रशिक्षण, प्लेसमेंट तयारी याबद्दल मार्गदर्शन केले. तसेच बँकिंग आणि विमा क्षेत्रा मधे काम कसे करावे त्यासाठी लागणारी कौशल्य ह्या बाबतीत सविस्तर मार्गदर्शन आणि प्रात्यक्षिके घेण्यात आली. ह्या कोर्स मधे उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्लेसमेंटची संधी देण्यात येणार आहे

ही प्रशिक्षण कार्यशाळा तीन टप्प्यांत पार पडली. ज्यात उद्घाटन समारंभ, ३२ दिवसीय प्रशिक्षण आणि समारोप समारंभ याचा समावेश होतं. समारोप प्रसंगी विद्यार्थ्यांनी आपल्या अनुभवांची मनोगते व्यक्त केली व प्रशिक्षणातून मिळालेल्या ज्ञानाबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच या उपक्रमासाठी दयानंद शिक्षण संस्थेचे व महाविद्यालयाचे मनःपूर्वक आभार मानले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी




महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. बी.टी. चव्हाण, बीसीए विभाग प्रमुख प्रा. शशिकांत स्वामी, बीबीए विभाग प्रमुख डॉ. वैशाली सातपुते, प्लेसमेंट प्रमुख प्रा. दगडू शेख तसेच सदस्य प्रा. शैलजा चिकटे, प्रा.नम्रता वाघमारे, प्रा. गीतांजली जोशी, प्रा. प्रसाद पाटील, प्रा. ज्योती महावरकर, डॉ. कल्याणी औसेकर व प्रा. सुहाना शेख आदी उपस्थित होते.

# सकारात्मक विचार : समाजजीवनाला दिशा देणारे प्रेरणास्त्रोत

मानवी जीवनाची पायाभरणी ही विचारांवर आधारित असते. व्यक्तीच्या मनात निर्माण होणारे विचार तिच्या वर्तनाला, कृतीला आणि निर्णयक्षमतेला दिशा देतात. प्रत्येक माणूस आपले आयुष्य घडवताना परिस्थितीशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करतो, त्यातूनच त्याच्या विचारप्रक्रियेचे स्वरूप ठरते. या विचारांमध्ये सकारात्मकता असेल तर जीवनाचा प्रवास सहज आणि सुलभ होतो, तर नकारात्मकता जीवनाला अडचणी, भीती आणि नैराश्याकडे नेते. म्हणूनच जगभर १३ सप्टेंबर हा दिवस 'सकारात्मक विचारांचा दिवस ( )' म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे महत्त्व केवळ वैयक्तिक पातळीपुरते मर्यादित नाही, तर त्याचे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय जीवनावरही दूरगामी परिणाम होतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून सकारात्मक विचार ही केवळ मानसिक आरोग्याची गुरुकिल्ली नसून समाजाच्या उन्नतीचे, प्रगतीचे आणि ऐक्याचे प्रमुख साधन आहे.

मानसशास्त्र आपल्याला सांगते की विचार हे मानवी जीवनाचे मूलभूत अधिष्ठान आहेत. परंतु समाजशास्त्राच्या नजरेतून पाहिले असता हे विचार केवळ वैयक्तिक प्रवासात अडकून राहत नाहीत, तर ते सामाजिक वर्तनाला आकार देतात. समाज ही व्यक्तींनी निर्माण केलेली रचना असल्याने समाजाच्या प्रवृत्ती आणि दिशा या व्यक्तींच्या विचारसरणीवरच ठरतात. जर समाजातील बहुसंख्य लोक सकारात्मक विचारांकडे झुकले तर त्या समाजात सहकार्य, समता, सहिष्णुता आणि प्रगतीची प्रक्रिया गतिमान होते. परंतु नकारात्मक विचारांचे प्रमाण वाढले तर समाजात अविश्वास, तणाव, हिंसा, शोषण आणि नैराश्याचे वातावरण निर्माण होते. म्हणूनच सकारात्मक विचारांचा दिवस हा समाजाला सकारात्मक विचारसरणीची आठवण करून देणारा आणि ती रुजविण्यासाठी प्रेरित करणारा दिवस ठरतो.

भारतीय संस्कृतीच्या परंपरेत सकारात्मक विचारांचे महत्त्व प्राचीन काळापासून अधोरेखित झालेले आहे. भारतातील अनेक प्रार्थना सकारात्मक विचारसरणीचेच द्योतक आहेत. या प्रार्थनांमधून सर्व मानवजातीच्या कल्याणाची, सुखाची आणि प्रगतीची भावना व्यक्त झाली आहे. संत ज्ञानेश्वरांनी आनंदी जीवनाचा संदेश दिला, तर संत तुकारामांनी संकटाच्या काळातही जीवनामध्ये आशावादी दृष्टिकोन ठेवण्याची शिकवण दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रतिकूल परिस्थितीतूनही शिक्षण, संघटन आणि संघर्षाच्या माध्यमातून नवा समाज उभारला. महात्मा गांधींनीही सकारात्मक विचारांना जीवनपद्धतीत स्थान देत 'अहिंसा आणि सत्याग्रह' या मार्गांचा अवलंब केला. या सर्व परंपरा आजच्या काळातही समाजाला प्रेरित करणाऱ्या आहेत.

आधुनिक समाजशास्त्रीय संदर्भात विचार करता सकारात्मक विचार ही फक्त वैयक्तिक उन्नतीची गुरुकिल्ली नाही, तर सामूहिक विकासाचे साधन आहे. उदाहरणार्थ, बेरोजगारी, गरिबी, महागाई, असमानता या समस्यांचा सामना करताना जर समाज सकारात्मक दृष्टिकोन ठेवतो, तर नवनव्या संधी, उद्योजकता, सामाजिक उपक्रम आणि सहकार्याचे मार्ग शोधले जातात. याउलट नकारात्मक विचार प्रबळ झाल्यास निराशा, गुन्हेगारी, व्यसनाधीनता आणि आत्महत्यांसारख्या समस्यांना खतपाणी मिळते. म्हणूनच समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून सकारात्मक विचार म्हणजे समस्यांपासून पळ काढणे नव्हे, तर समस्यांचा सामना करताना आशावादी भूमिका घेणे होय.

कुटुंबव्यवस्था ही समाजाची मूलभूत सामाजिक संस्था आहे. जर कुटुंबातील वातावरण सकारात्मक असेल, पालकांनी मुलांना आत्मविश्वास, धैर्य आणि सहकार्याची शिकवण दिली, तर त्या कुटुंबातून समाजासाठी सक्षम नागरिक तयार होतात. शाळा आणि महाविद्यालयांनी सकारात्मकतेवर आधारित संस्कृती जोपासली, तर विद्यार्थी केवळ गुणांच्या मागे धावणारे न राहता जीवनाकडे व्यापक दृष्टीकोनाने पाहणारे, सहानुभूतीने वागणारे आणि सामाजिक जबाबदारी ओळखणारे घडतात. कार्यक्षेत्रातही सकारात्मक विचारांचे वातावरण असेल, तर कामगार व अधिकारी यांच्यात विश्वास, सन्मान आणि परस्पर सहकार्य वाढते. समाजातील संघर्ष आणि तणाव कमी करण्यासाठी सकारात्मक विचार अत्यंत आवश्यक आहेत. जातीयवाद, धार्मिक असहिष्णुता, लिंगभेद, वर्णभेद यांसारख्या सामाजिक समस्या नकारात्मकतेतूनच जन्म घेतात. जर सकारात्मक विचारांची संस्कृती समाजात रुजवली गेली, तर विविधतेतून एकात्मता साधता येईल. सकारात्मक दृष्टिकोनातून माणूस दुसऱ्याच्या वेगळेपणाला धोका न मानता त्याला एक नवी संधी मानतो. त्यामुळे समाजात समतेचे, न्यायाचे आणि बंधुभावाचे मूल्य बळकट होतात.

आजच्या जागतिकीकरणाच्या काळात सकारात्मक विचारांची गरज अधिक तीव्रतेने भासते. स्पर्धेच्या या युगात अनेक तरुण अपयश, नोकरीची असुरक्षा, नात्यांमधील तणाव यामुळे नैराश्यात जातात. सामाजिक माध्यमामुळे सतत तुलना आणि अपुरे वाटण्याची भावना वाढीस लागते. या परिस्थितीत सकारात्मक विचारच मानसिक आरोग्याचे रक्षण करतात. एकाच वेळी, सामूहिक पातळीवरही सकारात्मक विचार समाजातील आशा जिवंत ठेवतात. उदा. कोविड-१९ महामारीच्या काळात अनेक लोकांनी सकारात्मक विचारसरणी स्वीकारत एकमेकांना मदत केली, रुग्णांना आधार दिला, आणि समाजाला एकत्र ठेवले. माध्यमांची भूमिका या संदर्भात महत्त्वाची ठरते. माध्यमांनी सतत नकारात्मक घटना दाखवून समाजात भीती आणि निराशा पसरवण्याऐवजी सकारात्मक उदाहरणे, प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वे आणि सामाजिक यशोगाथा दाखवल्या, तर सामूहिक चेतना अधिक बळकट होईल. शिक्षण प्रणालीनेही विद्यार्थ्यांमध्ये जीवनमूल्ये, आत्मविश्वास आणि सकारात्मक दृष्टिकोन रुजवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. शासनाने धोरणांमधून मानसिक आरोग्य, सामाजिक सलोखा आणि सामूहिक विकासाला चालना दिली पाहिजे.

सकारात्मक विचारांचा अर्थ वास्तवाकडे दुर्लक्ष करणे नाही. वास्तवातील अडचणी, संकटे आणि आव्हाने ओळखून त्यांना सामोरे जाण्याची प्रेरणा देणे हेच सकारात्मक विचारांचे खरे तत्त्व आहे. समाजात बदल घडवण्यासाठी, अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी, समता आणि न्यायासाठी प्रयत्न करण्यासाठीही सकारात्मक विचारांची ताकदच आवश्यक आहे. नकारात्मक विचार संघर्ष वाढवतात, तर सकारात्मक विचार संघर्षाला सृजनशीलतेत रूपांतरित करतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून सकारात्मक विचारांचा दिवस हा केवळ स्मरणदिन नाही, तर कृतीसाठी प्रेरणा देणारा क्षण आहे. या दिवसाच्या निमित्ताने व्यक्तीने स्वतःच्या मनात सकारात्मकता जोपासावी, कुटुंबाने आशावादी वातावरण निर्माण करावे, शाळा-महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढवावा, माध्यमांनी समाजाला प्रेरणा द्यावी आणि शासनाने धोरणांमधून सकारात्मकतेला चालना द्यावी. असे झाले तर समाजात एकात्मता, प्रगती, शांती आणि समता यांचे नवीन पर्व सुरू होईल.



एकंदरीत, सकारात्मक विचार ही समाजबदलाची खरी गुरुकिल्ली आहे. एका व्यक्तीच्या मनातील आशावादी विचारही संपूर्ण समाजाला प्रेरणा देऊ शकतात. वैयक्तिक जीवनातून सामूहिक जीवनापर्यंत सकारात्मक विचारांची ताकद मानवतेच्या उन्नतीसाठी मार्गदर्शक ठरते. म्हणूनच सकारात्मक विचारांचा दिवस हा समाजशास्त्रीय दृष्टीने पाहिला तर सामाजिक आरोग्य, विकास आणि मानवी मूल्यांना अधोरेखित करणारा आहे. या दिवसाच्या निमित्ताने आपण सर्वांनी मिळून आशावादी, सकारात्मक विचारसरणीची संस्कृती रुजवण्याचा संकल्प केला, तर निश्चितच आपला समाज अधिक प्रगतिशील, सक्षम आणि मानवी मूल्यांनी समृद्ध बनेल.

**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्र आणि मराठीचे अभ्यासक आहेत)**
**मो. क्र. ९९६०१०३५८२**

# एकात्म मानवदर्शन : भारतीय जीवनमूल्यांवर आधारित सर्वांगीण विकासाचे तत्वज्ञान

भारतीय संस्कृती ही प्राचीन,बहुआयामी व सार्वकालिक मूल्यांनी समृद्ध अशी संस्कृती आहे.या संस्कृतीत मानवी जीवनाचा विचार केवळ भौतिकतेपुरता मर्यादित न राहता आध्यात्मिक व नैतिक मूल्यांशी जोडलेला आहे.पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी मांडलेले एकात्म मानवदर्शन हे भारतीय जीवनदृष्टीचे मूळ तत्त्वज्ञान असून,त्यामध्ये पाश्चात्य विचारसरणीतील उणिवांकडे लक्ष वेधून सर्वांगीण विकासाचा मार्ग दाखविण्यात आला आहे.

पाश्चात्य विचारसरणीचा एकांगीपणा समाजवाद व भांडवलवाद या पाश्चात्य विचारसरणींनी मानवाचे सुख केवळ भौतिक साधनांवर अवलंबून असल्याचे मानले.भांडवलवादात व्यक्तीला केंद्रस्थानी ठेवून समाजाकडे दुर्लक्ष करण्यात आले,तर समाजवादाने समाजाला महत्त्व देताना व्यक्तीच्या स्वातंत्र्य व विकासाकडे दुर्लक्ष केले.परिणामी व्यक्ती,कुटुंब,समाज,सृष्टी व परमेश्वर या सर्वांचा विचार वेगळा-वेगळा करून परस्परविरोध निर्माण करण्यात आला.

भारतीय दृष्टिकोन

भारतीय संस्कृती मानवाला केवळ शरीरापुरता मर्यादित न ठेवता शरीर, मन,बुद्धी व आत्मा या चार घटकांचा समन्वय मानते.या चारही घटकांचा विकास झाल्याशिवाय मानवाचे जीवन पूर्ण होत नाही.म्हणूनच भारतीय जीवनदृष्टीत धर्म,अर्थ,काम व मोक्ष हे चार पुरुषार्थ सांगितले गेले आहेत.यामुळे मानवाचा भौतिक व आध्यात्मिक असा संतुलित व सर्वांगीण विकास साधता येतो.


एकात्म मानवदर्शन हे तत्वज्ञान व्यक्ती,कुटुंब,समाज,सृष्टी व परमेश्वर यांच्यातील नैसर्गिक एकात्मतेवर आधारलेले आहे.त्यामुळे प्रत्येकाने स्वत:सोबतच कुटुंब,समाज,राष्ट्र,सृष्टी व परमेश्वर यांचा विचार करणे अपेक्षित आहे.अशाप्रकारे समाजहित व वैयक्तिक हित यांचा समन्वय साधणारा मानव घडवणे हा या तत्त्वज्ञानाचा प्रमुख हेतू आहे.

शाश्वत विकासाची दिशा

आजच्या काळात शाश्वत विकास हा संकल्पना म्हणून जगभर चर्चिला जातो. एकात्म मानवदर्शन हे तत्त्वज्ञान प्रत्यक्षात शाश्वत विकासाचेच द्योतक आहे.यात पर्यावरणाचा समतोल,संयमित उपभोग, ग्रामविकास,रोजगारनिर्मिती आणि स्वदेशी तत्त्व यावर भर दिला आहे. पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी अर्थविचारामध्ये एकात्म मानववादाच्या आधारे पुढील मुद्दे स्पष्ट केले आहेत : सामान्य माणूस केंद्रबिंदू अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट सामान्य माणसाच्या गरजा भागविणे हेच असले पाहिजे. अर्थायामातील संतुलन अर्थाभाव व अर्थाधिक्य यातील संतुलन राखणे गरजेचे आहे.भारतीय तंत्रज्ञान व रोजगार स्थानिक तंत्रज्ञानाचा वापर करून रोजगार निर्मितीला प्रोत्साहन. स्वदेशी व विकेंद्रीकरण परकीय अवलंबित्व टाळून स्वदेशी साधनसंपत्ती व उत्पादनाला प्राधान्य. संयमित उपभोग पर्यावरण संरक्षणासाठी मितव्यय व संयम आवश्यक.ग्राम आधारित अर्थव्यवस्था खेडी ही भारताची पायाभूत ताकद असल्याने ग्रामविकासावर भर.लघु व विशाल उद्योगांचे परस्परपूरक नाते स्पर्धा न करता सहकार्य व समन्वय.संरक्षण सिद्धता राष्ट्राच्या सुरक्षेसाठी स्वयंपूर्णता आवश्यक.

एकात्म मानवदर्शन हे केवळ राजकीय वा आर्थिक विचार नसून,तो भारतीय जीवनपद्धतीशी जोडलेला सर्वांगीण मानव विकासाचा मार्गदर्शक तत्त्वज्ञान आहे.यातून निर्माण होणारा संतुलित,शाश्वत व नैतिक विकास हाच आजच्या जागतिक समाजासाठीही मार्गदर्शक ठरू शकतो.

**संकलन**
**जिल्हा माहिती कार्यालय**
**धाराशिव**



# जातीपातीच्या लढ्यात मराठवाडा भरकटतोय!





**जातीपातीचे राजकारण हे महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासातील जुने सत्य आहे. गेल्या अनेक दशकांपासून राजकीय पक्षांनी स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी आणि मतपेट्या भरण्यासाठी याच मुद्द्याचा वापर केला आहे. समाजात फूट पाडून आपली पोळी भाजणे हा सोपा मार्ग ठरला आहे. आजही तोच प्रयोग पुन्हा होताना दिसतोय..**

जातीपातीचे राजकारण गेल्या कित्येक वर्षांपासून सुरू आहे. याच मुद्द्यावर अनेक राजकीय पक्षांनी स्वतःची पोळी भाजून घेतली आहे. समाजात तेढ निर्माण करण्यासाठी जातीपातीचे राजकारण केले की, ते नेहमीच यशस्वी होते, असा आजवरचा इतिहास आहे. नेमक्या त्याच उद्देशाने मराठवाड्यात मराठा विरुद्ध ओबीसी असे राजकारण पेटविण्यात आले. हे राजकारण कोणी पेटविले हा भाग चर्चेचा असला तरी यामुळे मात्र मराठवाड्यात जातीपातीत तेढ निर्माण झाली आहे. सध्या मनोज जरांगे यांना दिलेल्या आश्वासनानंतर मराठवाड्यात ओबीसी समाजही शासनाविरुद्ध तीव्र संताप व्यक्त करीत आहे. यामुळे ग्रामीण भागात मात्र मराठा विरुद्ध ओबीसी असे चित्र तयार झाले आहे. आरक्षणाच्या मुद्द्यावरून मागील १५ ते २० दिवसांत महाराष्ट्रात भरपूर आंदोलने झाली. मराठा विरुद्ध ओबीसी असे चित्र मराठवाड्यात निर्माण झाले आहे. प्रत्यक्षात शैक्षणिक जागृती झाल्याने अभियांत्रिकी तसेच वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी प्रत्येकजण पुढाकार घेत आहे. या शिक्षणासाठी म्हणावे तसे आरक्षण भेटत नसल्याने ओबीसी, मराठा तसेच खुल्या प्रवर्गातील अनेकजण त्रस्त असतात. आरक्षण नसल्यामुळे अनेकांना नोकरी देखील मिळत नाही. पुरेशा संधी उपलब्ध नसल्याची ओरड होती. नोकरीसाठी व शिक्षणासाठी आरक्षणाची गरज दाखविली जात आहे.मनोज जरांगे यांचे मुंबईतील आंदोलन यशस्वी झाल्यानंतर मराठवाड्यात मराठा समाजातर्फे जल्लोष करण्यात आला. तसेच आरक्षण मिळाले व काहींनी आरक्षण मिळूनही काही फायदा होणार नाही, अशा प्रतिक्रिया व्यक्त केल्या. त्यामुळे शासनाने काढलेला जी. आर. खरोखर फायद्याचा आहे की नाही याबद्दल मराठवाड्यातील मराठा समाजही संभ्रमात आहे. दुसरीकडे मराठवाड्यातील धाराशिव, नांदेड, बीड व परभणी जिल्ह्यात ओबीसी समाजाच्यावतीने भरगच्च मेळावे घेण्यात आले. या मेळाव्यातून शासनाने काढलेल्या जी.आर.चा निषेध करण्यात आला. तसेच मराठा समाजाला शासनातर्फे दिलेले आश्वासन पाळले जाऊ नये, अशी मागणी या मेळाव्यांमधून होत आहे. तसेच याबाबत ओबीसी समाजातर्फे न्यायालयात दाद मागण्यात येईल या दृष्टीने मराठवाड्यातून अनेक जिल्ह्यातील नेत्यांनी तयारी दर्शविली आहे. एकीकडे जल्लोष व दुसरीकडे नाराजी असे चित्र मराठवाड्यात निर्माण झाले आहे. यामुळे राजकीय वातावरण देखील तापले आहे. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ओबीसी समाजाने भाजपला मतदान करू नये, असे आवाहन मेळाव्यामधून केले आहे. तर मराठा समाज मात्र भाजपच्या पाठीशी उभा राहील, असे एकंदरीत चित्र दिसत आहे. ओबीसीमधील शंभरपेक्षा अधिक जातींनी नांदेडमध्ये वज्रमुठ आवळली. नांदेडमध्ये ओबीसी हक्क मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात ओबीसी समाजाने आपली एकजूट दाखविली. शासनाच्या अन्यायाविरुद्ध संघर्षाची भूमिका व्यक्त करत प्रत्येक तालुक्यातून ५० हजार नागरिकांच्या मदतीने मोर्चा काढण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. मराठवाड्यातील आठही जिल्ह्यात १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्रामदिनी आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, बीड, धाराशिव, लातूर या जिल्ह्यात ओबीसी नेत्यांनी एकात्मतेचा संदेश देत आरक्षण हक्काच्या बचावासाठी संघर्ष करण्याचे आवाहन केले आहे. सर्व समाज घटकांनी संघटितपणे पुढाकार घेऊन शासनाच्या अन्यायाविरुद्ध ठामपणे उभे राहण्याचे आवाहन ओबीसी, भटके विमुक्त व बलुतेदार यांच्यावतीने करण्यात आले आहे. दुसरीकडे मराठवाड्यात कुणबी समाज मोठ्या प्रमाणात आहे. सध्या कौटुंबिक परिस्थिती बदललेली आहे. मराठा समाजातील तिसऱ्या व चौथ्या पिढीसमोर अनेक आव्हाने उभी आहेत. मराठा समाजाचे अर्थकारण समजून घेऊन मराठा समाजाला ओबीसीचे आरक्षण कसे आवश्यक आहे हे देखील मराठा समाजाकडून सांगितले जात आहे. विशेष म्हणजे मराठवाड्यातील नेत्यांविरुद्ध प्रसार माध्यमाद्वारे मराठा समाजातून प्रचंड टीका होत आहे. माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण तसेच विलासराव देशमुख या दोन्ही नेत्यांवर मराठा समाजातील अनेकांनी टीका केलेली आहे. याबरोबरच शरद पवार यांच्यावरही मोठ्या प्रमाणात टीकेचा भडीमार होत आहे. तर दुसरीकडे ओबीसी समाजाने राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांच्याकडून मोठी अपेक्षा व्यक्त केली आहे. न्यायालयात जाऊन शासनाने दिलेला जी. आर. रद्द करण्याबाबत पुढाकार घ्यावा व त्यास संपूर्ण ओबीसी समाज पाठिंबा देईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.ज्या हैदराबाद गॅझेटनुसार मराठा समाजाला ओबीसीचे आरक्षण दिले जात आहे, त्याच धर्तीवर हैदराबाद गॅझेटनुसार बंजारा समाजाला अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट करा, अशी मागणी जोर धरू लागली आहे. मराठवाड्यातील खुल्या प्रवर्गातील नागरिकांना वगळता सर्वच जाती-धर्माच्या नागरिकांनी आरक्षणाची मागणी केली आहे. आम्हाला देखील आरक्षण मिळावे, असे प्रत्येकाला वाटू लागले आहे. त्यामुळे मराठवाड्यात ग्रामीण भागात विशेषतः मराठा विरुद्ध ओबीसी असे वातावरण तयार झाले आहे. पूर्वी एकोप्याने राहणारे हे दोन्ही समाज आता आरक्षणामुळे विभागले गेले आहेत. ही एक खूप मोठी शोकांतिका म्हणावी लागेल.

## आहार आणि जीवनशैलीसाठी

**संतुलित आहार:** तुमच्या आहारात फळे, भाज्या, संपूर्ण धान्य आणि प्रथिनांचा समावेश करा.

**पुरेसे पाणी प्या:** दररोज पुरेसे पाणी पिणे आरोग्यासाठी खूप महत्त्वाचे आहे.

**नियमित व्यायाम:** दररोज काही वेळ व्यायामासाठी द्या, जेणेकरून शरीर निरोगी राहील.

**पुरेशी झोप:** शरीराला पुरेशी विश्रांती देण्यासाठी दररोज रात्री पुरेशी झोप घेणे महत्त्वाचे आहे.

**तणाव कमी करा:** तणाव कमी करण्यासाठी योगा किंवा ध्यान यांसारख्या गोष्टी करा. मद्यपान टाळा:मद्यपान करणे टाळा किंवा कमी करा. वैयक्तिक स्वच्छतेची काळजी घेतल्याने अनेक आजार टाळता येतात.

## साखरच नव्हे तर या पदार्थांमुळे तुमचे दात होतात खराब, वेळीच लक्ष द्या नाहीतर...



क्शरश्रींह: साखरच नव्हे तर या पदार्थांमुळे तुमचे दात होतात खराब, वेळीच लक्ष द्या नाहीतर... मुंबई: साखर आणि गोड पदार्थ खाल्ल्याने दातांना कीड लागते हे आपल्याला माहीत आहे. पण असे अनेक पदार्थ आहेत जे गोड नसतानाही दातांसाठी तितकेच हानिकारक असतात. हे पदार्थ दातांच्या संरक्षणासाठी असलेल्या इनॅमलला नुकसान पोहोचवतात. असे काही पदार्थ खालीलप्रमाणे १. पांढरा ब्रेड: पांढरा ब्रेड खाल्ल्याने दातांना मोठे नुकसान होते. जेव्हा आपण ब्रेड खातो, तेव्हा त्याचे लहान कण दातांमध्ये आणि हिरड्यांमध्ये अडकतात. नंतर हे कण साखरेत रूपांतरित होतात, ज्यामुळे दातांना कीड लागण्याचा धोका वाढतो. ब्रेडच्या जागी गव्हाच्या पिठापासून बनवलेला ब्रेड खाणे अधिक चांगले मानले जाते. २. वाईन: वाईन दातांसाठी अत्यंत हानिकारक असू शकते. लाल वाईन दातांवर डाग पाडते, तर पांढऱ्या वाईनमध्ये असलेले ॲसिड दातांचे इनॅमल खराब करते. त्यामुळे वाईन प्यायल्यानंतर लगेच पाणी पिणे किंवा दात स्वच्छ करणे महत्त्वाचे आहे. ३. एनर्जी ड्रिंक्स: एनर्जी ड्रिंक्समध्ये मोठ्या प्रमाणात साखर आणि ॲसिड असते. हे घटक दातांच्या इनॅमलसाठी अत्यंत हानिकारक आहेत आणि दातांना वेगाने खराब करतात. त्यामुळे शक्यतो एनर्जी ड्रिंक्स पिणे टाळावे.

# चुकीच्या बाबी व गैरसमज दूर करा

स्त्री आरोग्य : डॉ. स्नेहल पाटील



गर्भधारणा हा स्त्रीच्या आयुष्यातील एक अत्यंत महत्त्वाचा आणि संवेदनशील टप्पा असतो. या काळात आई व बाळाच्या आरोग्याबद्दल अनेक पारंपरिक समज-गैरसमज समाजात आढळतात. त्यातील एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे गर्भावस्थेत चंद्रग्रहण किंवा सूर्यग्रहणाच्या काळात घेतली जाणारी काळजी. पारंपरिक समज व गैरसमज भारतीय संस्कृतीत ग्रहणाला धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व दिले गेले आहे. विशेषतः गर्भवती स्त्रियांबद्दल खालील काही समज आजही प्रचलित आहेत.

१. ग्रहणाच्या वेळी घराबाहेर जाऊ नये : असा समज आहे की गर्भवती स्त्री बाहेर गेल्यास बाळावर वाईट परिणाम होऊ शकतो. २. ग्रहणकाळात धारदार वस्तू वापरू नयेत : कात्री, सुरी, सुई वापरल्यास बाळाला जन्मजात दोष येतात असा गैरसमज आहे. ३. ग्रहणाच्या वेळी झोप घेऊ नये : झोपल्यास बाळाच्या शरीरावर डाग पडतात असा समज आहे. ४. ग्रहणकाळात अन्नपदार्थ खाऊ नयेत : ग्रहणावेळी खाल्लेलं अन्न विषारी होते किंवा बाळाला त्रास होतो असे मानले जाते. ५. ग्रहण पाहिल्यास अपत्यावर परिणाम होतो : डोळ्यांनी ग्रहण पाहिल्यास बाळाला कधी कटाक्ष, कधी तडे, कधी अंगावर डाग येतील असे म्हटले जाते.

शास्त्रीय दृष्टिकोन स्त्रीरोगतज्ज्ञ व वैद्यकीय शास्त्राच्या दृष्टीने पाहिल्यास या समजांमध्ये शास्त्रीय आधार नाही. चंद्रग्रहण हे पृथ्वी, चंद्र आणि सूर्य यांच्या हालचालींमुळे होणारे खगोलशास्त्रीय नैसर्गिक घटना आहे. याचा गर्भवती स्त्रीच्या शरीरावर किंवा गर्भाच्या वाढीवर थेट परिणाम होत नाही. धारदार वस्तू वापरल्याने बाळावर कोणतेही शारीरिक दोष येत नाहीत. ग्रहणावेळी झोप घेणे गर्भावस्थेत अजिबात हानिकारक नाही; उलट पुरेशी विश्रांती आईसाठी फायदेशीरच ठरते. अन्न ग्रहणकाळात खराब होत नाही. मात्र, पारंपरिक दृष्टीने ग्रहणकाळात स्वच्छता, कीटकजन्य संसर्ग टाळण्यासाठी अन्न झाकून ठेवणे योग्य आहे. डोळ्यांनी ग्रहण थेट पाहिल्यास डोळ्यांवर परिणाम होऊ शकतो (विशेषतः सूर्यग्रहणाच्या वेळी). पण तो परिणाम आईच्या डोळ्यांवर होतो, गर्भावर नाही. योग्य काळजी

गैरसमज बाजूला ठेवून गर्भवती स्त्रीने या काळात खालील साध्या व वैज्ञानिक सवयी पाळाव्यात - १. स्वच्छता राखणे : ग्रहण असो वा नसो, गर्भावस्थेत घरातील स्वच्छता, अन्न झाकून ठेवणे व स्वच्छ पाणी पिणे आवश्यक आहे. २. संतुलित आहार घेणे : ग्रहणामुळे अन्न विषारी होत नाही. त्यामुळे वेळेवर संतुलित व पौष्टिक आहार घ्यावा. ३. पुरेशी विश्रांती : ग्रहणकाळात झोप घेतली तरी त्याचा गर्भावर कोणताही अपाय होत नाही. आईने मन शांत ठेवून पुरेशी झोप घेतली पाहिजे. ४. मानसिक आरोग्य जपणे : अनेकदा जुन्या समजुतींमुळे गर्भवती स्त्रीला भीती वाटते. तणावामुळे गर्भावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे कुटुंबाने तिचा आत्मविश्वास वाढवावा. ५. वैद्यकीय तपासण्या नियमित करणे : ग्रहणाशी काहीही संबंध नसला तरी गर्भावस्थेत वेळोवेळी सोनोग्राफी, रक्त तपासण्या व डॉक्टरांचा सल्ला घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ६. धार्मिक श्रद्धांचा आदर : काही स्त्रिया व कुटुंबीय धार्मिक श्रद्धेमुळे ग्रहणकाळात विशिष्ट पद्धती पाळतात. जर या पद्धतींमुळे आईच्या शारीरिक किंवा मानसिक आरोग्यावर वाईट परिणाम होत नसेल, तर त्यात अडचण नाही. मात्र वैद्यकीयदृष्ट्या गरजेच्या गोष्टी (आहार, विश्रांती, औषधे) टाळू नयेत.

निष्कर्ष चंद्रग्रहण किंवा सूर्यग्रहण या नैसर्गिक घटना आहेत. गर्भवती स्त्री किंवा गर्भावर त्यांचा कोणताही थेट दुष्परिणाम होत नाही. समाजात प्रचलित समज-गैरसमजांपेक्षा वैज्ञानिक दृष्टिकोन, संतुलित आहार, नियमित व्यायाम, पुरेशी विश्रांती व वैद्यकीय सल्ला हेच गर्भवती स्त्रीसाठी खरी काळजी आहेत.गर्भधारणेचा काळ हा आनंदाचा काळ असतो. त्यामुळे अनावश्यक भीती व गैरसमज दूर करून सकारात्मक वातावरणात हा काळ घालवणे हेच आई व बाळाच्या आरोग्यासाठी उपयुक्त ठरते.

## जांभळाचे सरबत डायबिटीजसाठी उपयोगी औषध

## डॉक्टर टीप्स

### जांभळाचे सरबत



साहित्य - पाव किलो जांभळे, एक ग्लास साखर.

कृती - जांभळे बुडतील इतक्या पाण्यात कुकरमध्ये उकडून घ्या . पाण्यासह जांभळे कुस्करून बिया काढा. मिक्सर मध्ये फिरवून (हवे असल्यास गाळून ) घ्या. एक ग्लास साखरेचा दोन तरी पाक करून घ्या. थंड झाल्यावर पाक आणि जांभूळ गर मिसळा. एक ग्लास सरबत बनवताना पाऊण ग्लास मिश्रण आणि पाव ग्लास पाणी घाला. आवडत असेल तर साखर घाला. ढवळा. हे जांभूळ सरबत अगदी नैसर्गिक असल्यामुळे चवदार लागते. तुम्ही आईसक्रीम मध्येही घालू शकता. जांभूळ हे उत्तम फळ आहे सुश्रुतांच्या मते जांभूळ पित्त, रक्तदहनाशक, शरीराची कांती सुंदर बनवणारे आहे. जांभूळ खाल्ल्याने रक्त लाल बनते. जांभळे मीठ टाकून खाणे हितावह आहे जांभळा मध्ये लोह फॉस्फरस, फॉलिक एसिड असते. जांभळे किडकी खाऊ नयेत. जांभूळ पिकण्यासाठी ग्रीष्माचे ऊन आणि वर्षाऋतूतील पावसाचा शिडकावा लागतो.




## विनोद

**मुन्ना : तुला जपानी बोलता येते?**

**पप्पू : हो.**

**मुन्ना : बोल बरं.**

**पप्पू : जपानी.**

## संदेश

Santa Banta Hindi Jokes
Banta: Santa, itna udhaas kyu baita hai?
Santa: yaar betting mein maine 2000 gavaa diyaa :-(
Banta: kaise?
Santa: India pe 1000 rupaiye ka bet lagaaya tha aur India ne match haar gaya
Banta: lekin 2000 kaise?
Santa: aaj us match ka highlights daale. India pe ummeed rakh ke phir 1000 dala tha.

## सुविचार



जर विज्ञानावर शहाणपणाचे नियंत्रण नसेल तर ते भ्रमिष्टपणाने वागेल. **- स्पॅनिश म्हण**


संस्कृत सुभाषित

अमित्रमुपसेवेत विश्वस्तवदविश्वसन्
प्रियमेव वदेन्नित्यं नाप्रियंकिंचिदाचरेत्।।

(शांतीपर्व, अध्याय १०३, ेक ९, महाभारत)

**अर्थ -** शत्रूवर विश्वास न ठेवता विश्वास ठेवल्याचा बहाणा करून त्याच्या कलाने वागावे. त्याच्याशी नेहमी गोड बोलावे. त्याला न रुचणारी गोष्ट करू नये.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. जमिनीवरचे प्राणी, पशू
४. अग्रलेख
९. पहारा करणारा
१०. प्रचंड, तीव्र
११. नजरेचा तीर
१६. गालबोट
१७. उडाणटप्पूंची चैन
१८. बादशहाचा प्रधान
२०. सबब
२१. नूतन
२२. मृतिका, मृदा
२३. निरर्थक
२४. शृंखला
२६. कर्ण
२८. जास्तीत जास्त
२९. हाताचा तळवा
३२. दिखाऊ, वरपांगी
३४. अवघा, सगळा
३६. गार, थंड
३७. प्रत्येक ठिकाणी, सर्वत्र
३८. वंचित
३९. टक, दृष्टी
४२. दोस्त
४३. अंत:करण
४४. जाणकार
४६. तासाशी गुणोत्तर
४७. अथवा
४८. युवती
५०. जानकी
५१. आजार, रोग
५५. लेंगा
५७. परिस्थिती
५८. अंगठी घालण्याचे बोट
५९. मूळ आधार
६०. आजच्या आधीचा दिवस
६१. गोव्यातील दैवत
६२. हालचालीवरील नजर
६४. गवत, गुरांचे खाद्य
६६. बस्तान
६७. शहर, गाव
६९. स्वच्छ, चकचकीत
७१. श्रीमंत
७२. शत्रूला गाठण्याची चिंचोळी जागा
७३. बासरी
७४. उद्याच्या नंतरचा दिवस
७७. वृक्ष
७८. बघू नये अशी स्वयंपाकाची जागा!
७९. जयाचा नामघोष

### उभे शब्द

१. 'सिने में ---, आंखो ने तुफान सा क्यों है, इस शहर में हर शख्स परेशानसा क्यों है'
२. पक्के वचन
३. सभ्य माणसांचे 'व्यसन'!
४. संकटाच्या वेळी
५. मोदकाचे आवरण
६. आमंत्रक, कुटुंबोप्रमुख
७. संकटातून निभावणे
८. जवळचा घरातील शत्रू
९. गोव्याची राजधानी
१०. बारीक वाळू
१२. चांगला
१४. योग्य, बरोबर
१५. चोख, निर्भेळ सोने
१७. कण्यातील हाड
१९. पाताळ
२२. आईचा भाऊ
२३. ऐनवेळी कच खाणे
२५. दुष्ट, खल
२७. नुकतेच जन्मलेले
२८. कर देण्यास योग्य
३०. मौल्यवान खडा (हिंदी)
३१. मालवणी गोडी शेव
३३. अंगातील मस्ती, जोश
३५. शाहरुखचे फिल्मी नाव
४०. रम्य, मनोहर
४१. तेंडुलकरांचे वादग्रस्त नाटक 'घाशीराम ----'
४२. पैजेत पीळ देण्याची-उतरवण्याची
४४. जननी
४५. शाळकरी मुलांना, नोकरदारांना हवा-हवासा दिवस
४६. धातूचा धागा
४९. भारतीय चलन
५०. वेस, हद्द
५२. गायींचे पिल्लू
५३. लक्ष्मीवल्लभ
५४. ठेकेदार
५६. निकट
५७. चलनवलन
५८. अगम्य
५९. बाजीप्रभूंनी लढवलेली जागा
६२. पलीकडे
६३. समशेर
६५. रक्षाबंधनाचा धागा
६६. अटीची भाषा
६८. डोंगरी किल्ला
७०. तपश्चर्या, साधना
७३. पाण्याचा प्रवाह
७५. मातीचा कण
७६. इंग्रेजी वर्णमालेतील शेवटून दुसरे अक्षर

### आडवे उत्तर


१.जनावर ४.संपादकीय ९.पहारेकरी ११.जबरदस्त १३.नयनबाण १६.तीट १७.मजा मारणे १८.वजीर २०.कारण २१.नवा २२.माती २३.अर्थहीन २४.साखळी २६.कान २८.कमाल २९.करतल ३२.वरवर ३४.सारा ३६.शीतल ३७.जागोजाग ३८.पारखा ३९.नजर ४२.मित्र ४३.मन ४४.माहीतगार ४६.ताशी ४७.वा ४८.तरूणी ५०.सीता ५१.विकार ५५.पायजमा ५७.हालहलाव ५८.अनामिका ५९.पाया ६०.काल ६१.रवळनाथ ६२.पाळत ६४.चारा ६६.जम ६७.नगर ६९.लखलखीत ७१.मालदार ७२.खिंड ७३.पावा ७४.परवा ७७.तरू ७८.भटारखाना ७९.जयजयकार

### उभे उत्तर

१.जलन २.वचन ३.चहा ४.संकटकाळी ५.पारी ६.यजमान ७.तरणे ८.अस्तनीतील निखारा ९.पणजी १०.रेती १२.बरवा १४.यर्थाथ १५.बावनकशी १७.मणका १९.रसातल २२.मामा २३.अवसानघात २५.खल २७.नवजात २८.करपात्र ३०.रतन ३१.खाजा ३३.रग ३५.राज ४०.रमणीय ४१.रुपाया ५०.सीमा ५२.कालवड ५३.श्रीनाथ ५४.मुकादम ५६.जवळ ५७.हालचाल ५८.अनाकलनीय ५९.पावनखिंड ६२.पार ६३.तलवार ६५.राखी ६६.जरतर ६८.गड ७०.तप ७३.पाट ७५.रज ७६.वाय




## १२० बहादूर च्या प्रदर्शनापूर्वी फरहान अख्तर कोलकाताला पोहोचला,




मुंबई-पीव्हीसी मेजर शैतान सिंग भाटी यांची शौर्याची कहाणी आता प्रेक्षकांना लवकरच पाहायला मिळणार आहे. हा चित्रपट खूप धमाकेदार असणार आहे. अभिनेता फरहान अख्तर अभिनीत चित्रपट म१२० बहादूरफ सध्या चर्चेत आहे. म१२० बहादूरफ चित्रपट देशभक्तीची कहाणी सांगतो. तसेच हा चित्रपट प्रेक्षकांना रोमांच आणि वीरतेची खोल अनुभूती देईल. दरम्यान चित्रपटाच्या प्रदर्शनापूर्वी फरहान अख्तरनं कोलकाताला भेट दिली आणि तिथे एका कार्यक्रमात सहभागी झाला, जिथे त्यानं चित्रपटाशी संबंधित आपला उत्साह, भावना मीडिया आणि चाहत्यांबरोबर शेअर केल्या. आता अनेकजण हा चित्रपट पाहाण्यासाठी खूप उत्सुक आहेत. हा चित्रपट १९६२च्या रेझांग ला युद्धावर आधारित आहे.

म१२० बहादूरफ चित्रपटाबद्दल : या चित्रपटात १२० भारतीय सैनिकांची खरी आणि शौर्याची कहाणी दाखवण्यात आली आहे. म१२० बहादूरफ चित्रपटामध्ये शत्रूंसमोर हार न मानता आपल्या भूमीचे रक्षण काही शूरवीरांनी केले होते. दरम्यान भारतीय इतिहासातील सर्वात धाडसी युद्धांपैकी एक रेझांग ला आहे. या संपूर्ण कथेचा आत्मा महम पीछे नहीं हटेंगेफ हा आहे. ही ओळ चित्रपटात सर्वत्र प्रतिध्वनित होते. या चित्रपटामध्ये देशभक्तीच्या भावना सुंदरपणे मांडण्यात आल्या आहेत. हा चित्रपट रजनीश मरेजीफ घई यांनी दिग्दर्शित केला आहे. रितेश सिधवानी, फरहान अख्तर (एक्सेल एंटरटेनमेंट)आणि अमित चंद्रा (ट्रिगर हॅपी स्टुडिओ) यांनी चित्रपटाची निर्मित केली आहे. म१२० बहादूरफ हा चित्रपट रुपेरी पडद्यावर २१ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रदर्शित होणार आहे.म१२० बहादूरफची स्टारकास्ट : म१२० बहादूरफमध्ये शत्रूंसमोर उभे राहून हार न मानता आपल्या भूमीचं रक्षण कस केलं जाते, याबद्दलचे वर्णन असून यात आणखी अशा गोष्टी प्रेक्षकांना पाहायला मिळेल, ज्याबद्दल त्यांना माहिती नसेल.

# अभिनेत्री ऐश्वर्या राय हायकोर्टात पोहोचली

## परवानगी शिवाय फोटो व्यवसायिक जाहिराती करणाऱ्यांविरोधात याचिका



मुंबई-बॉलिवूड अभिनेत्री ऐश्वर्या राय बच्चन दिल्ली उच्च न्यायालयात पोहोचली आहे. अभिनेत्री ऐश्वर्या राय हिने 'पर्सनॅलिटी राईट्स'च्या संरक्षणासाठी याचिका दाखल केली आहे. परवानगी शिवाय फोटो व्यवसायिक जाहिराती करणाऱ्यांविरोधात ऐश्वर्याने दिल्ली उच्च न्यायलयात याचिका दाखल केली आहे. ऐश्वर्या रायच्या वकिलांनी न्यायालयाला त्या वेबसाइट्स आणि कंटेंटबद्दल माहिती दिली, ज्यावर तिच्या नावाचा आणि फोटोंचा व्यावसायिक वापर परवानगीशिवाय केला जात आहे. न्यायालयात वकिलांनी एका वेबसाइटचा दाखला देत सांगितले की, अभिनेत्रीने त्यांना परवानगी दिलेली नाही, तरीही फोटो वापरले जात आहेत. दुसऱ्या वेबसाइटवर ऐश्वर्या राय यांचे वॉलपेपर आणि फोटो टाकण्यात आले आहेत, तर तिसऱ्या कंपनीकडून त्यांच्या फोटोंचे प्रिंट असलेले टी-शर्ट्स विकले जात आहेत. परवानगीशिवाय अशा प्रकारच्या कृती त्यांच्या वैयक्तिक हक्कांचे उल्लंघन आहेत आणि त्या थांबवणे अत्यंत आवश्यक आहे, असा युक्तीवाद ऐश्वर्या रायच्या वकिलांनी केला आहे.

अभिनेत्री ऐश्वर्या रायच्या वर्कफ्रंटबाबत बोलायचे झाले तर ती पोन्नियिन सेल्वन या चित्रपटात ती झळकलेली पाहायला मिळाली होती. या चित्रपटाचे दोन भाग आले होते. पहिला भाग २०२२ मध्ये आणि दुसरा भाग २०२३ मध्ये प्रदर्शित झाला होता. या चित्रपटात ऐश्वर्या रायने 'नंदिनी' ही भूमिका साकारली होती आणि त्यांची भूमिका प्रेक्षकांना खूप आवडली होती. याआधी ऐश्वर्या फन्ने खान, ए दिल है मुश्किल, सरबजीत, जज्बा यांसारख्या चित्रपटांमध्ये महत्त्वाच्या भूमिका साकारताना दिसली होती. ऐश्वर्या राय हिने १९९७ साली 'और प्यार हो गया' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. त्यानंतर तिने बॉलिवूडला अनेक उत्कृष्ट चित्रपट दिले आहेत. चित्रपटांबरोबरच ऐश्वर्या जाहिरातींमधूनही मोठी कमाई होते. अशा परिस्थितीत त्यांचा आर-ोप आहे की, काही उत्पादनांनी त्यांचे एआय जनरेटेड फोटो वापरले आणि त्यासाठी त्यांची परवानगीसुद्धा घेतली नाही.

### फक्त ९ थिएटर्समध्ये रिलीज झालेली राजेश खन्नांची बोल्ड फिल्म

## १ लाख ४० हजारांत बनलेल्या सिनेमाने कमावलेले ६ कोटी



मुंबई-बॉलिवूडचा पहिला सुपरस्टार म्हणजे, चाहत्यांचे लाडके बाबुमोशाय म्हणजेच, राजेश खन्ना . एक काळ होता, त्यावेळी राजेश खन्ना यांची एक झलक पाहण्यासाठी तरुण-तरुणी अक्षरश: वेड्या व्हायच्या. त्यांचे सिनेमे पाहण्यासाठी चित्रपटगृहाबाहेर लांब रांगा लागल्या होत्या. पण प्रत्येक सिनेस्टारप्रमाणे, राजेश खन्ना यांच्या कारकिर्दीतही अनेक चढ-उतार आले. एक काळ असा होता की, त्यांचे काही चित्रपट बॉक्स ऑफिसवर फारशी चांगली कामगिरी करू शकले नाहीत आणि त्यावेळी त्यांच्या स्टारडमला फटका बसेल की, काय? अशी परिस्थितीही निर्माण झाली होती. अशा वेळी राजेश खन्ना यांच्या आयुष्यात एक वळण आलं, ज्यानं सर्व काही बदलून टाकलं.

१९७३ मध्ये आलेल्या 'दाग' चित्रपटाच्या प्रीमियरमधला खाली दिसत असलेला फोटो आहे, ज्यामध्ये बॉलिवूडचे तीन मोठे स्टार दिसत आहेत. राजेश खन्ना, शर्मिला टागोर आणि यश चोप्रा... या प्रीमियरमध्ये राजेश खन्ना त्यांच्या सुपरस्टार प्रतिमेसह आले होते, तर शर्मिला टागोर यांनी त्यांच्या ग्लॅमरस अदांनी सर्वांचं लक्ष वेधून घेतलं होतं. चित्रपटाचे दिग्दर्शक आणि निर्माते यश चोप्रा त्यांच्या शांत आणि स्टायलिश शैलीत दोघांशीही बोलताना दिसत आहेत.

यशराज बॅनरची सुरुवात १९७३ मध्ये प्रदर्शित झा-लेला 'दाग' हा चित्रपट केवळ राजेश खन्ना यांचाच नाही तर, यश चोप्रांचाही पहिला चित्रपट होता. या चित्रपटाद्वारे त्यांनी यशराज बॅनरचा चित्रपट लाँच केला. यश चोप्रा हे त्या काळातील एक निर्माते होते, जे त्यांच्या काळाच्या खूप पुढे होते आणि बोल्ड कथा बनवण्यास अजिबात घाबरत नव्हते.

बोल्ड कथानक आणि फक्त नऊ थिएटर

'दाग'ची कथा त्या काळाच्या मानानं थोडी बोल्ड मानली जात होती. यश चोप्रा यांना भीती होती की, हा चित्रपट चांगला चालणार नाही, म्हणून त्यांनी तो फक्त नऊ थिएटरमध्ये प्रदर्शित केला. राजेश खन्ना यांनीही हा निर्णय स्वीकारला आणि कमी पैशात चित्रपट करण्यास होकार दिला. पण नियतीला वेगळंच मान्य होतं. जो विचार यश चोप्रा यांनी केलेला, त्याच्या नेमकं उलट सगळं घडलं.

चित्रपटाचं बजेट खूपच कमी होतं. राखीनं चित्रपटासाठी तीन लाख रुपये दिले आणि शर्मिला टागोर यांनीही खूपच कमी मानधन घेतलं. एकूणच 'दाग' फक्त १.४० लाखांमध्ये बनवण्यात आला. पण कमी बजेट असूनही, चित्रपटाची कथा आणि स्टारकास्टनं तो मोठा बनवण्याचं काम केलं. कमी बजेट आणि मर्यादित स्क्रीन असूनही, 'दाग'ने ६.५० कोटींचा व्यवसाय केला आणि बॉक्स ऑफिसवर खळबळ उडवून दिली. या चित्रपटाने हे सिद्ध केले की, योग्य कथा आणि योग्य कलाकार कोणाचंही नशीब बदलू शकतात. 'दाग'ने राजेश खन्ना यांच्या मागील अपयशाचे डाग धुवून टाकले आणि त्यांना रातोरात सुपरस्टार बनवले. यश चोप्रा यांचे नावही बॉलिवूडमध्ये स्थापित झाले. या चित्रपटाने दाखवून दिले की, थोडीशी जोखीम घेतल्यानं मोठी स्वप्न पूर्ण होऊ शकतात.

# प्रिया मराठेनंतर आणखी एका अभिनेत्याचे निधन?

मुंबई-अभिनेत्री प्रिया मराठेचे काही दिवसांआधी निधन झाले. प्रिया अनेक महिने कॅन्सरशी झुंज देतत होती अखेर तिची कॅन्सरशी झुंज अपयशी ठरली. प्रिया मराठेच्या निधनाच्या बातमीनंतर संपूर्ण मराठी इंडस्ट्रीला धक्का बसला आहे. तिच्या निधनाच्या धक्क्यातून बाहेर येत नाही तोच एका प्रसिद्ध मराठी अभिनेत्याच्या निधनाच्या अफवा पसरवण्यात आल्यात. स्वत:च्याच मृत्यूची बातमी अभिनेता चांगलाच भडकला आहे. सोशल मीडियावर विशेषत: युट्यूबवर कलाकारांच्या आयुष्याबद्दल अनेक व्हिडीओ शेअर केले जातात. त्यातही कलाकारांच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल माहिती देणारे अनेक व्हिडीओ असतात. अशातच प्रसिद्ध अभिनेते अभिजीत चव्हाण यांचं निधन झाल्याची माहिती देणारा एक व्हिडीओ समोर आला. हा व्हिडीओ पाहून अभिजीत चव्हाण चांगलेच संतापले. त्यांनी तो व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर करत नाराजी व्यक्त केली.



### स्वतःच्या मृत्यूची बातमी मराठी अभिनेता संतापला

प्रिया मराठेनंतर आणखीन एका मराठी अभिनेत्याचे निधन. मराठी निसृष्टीने दोन कलाकार गमवले, असं थमलेन असलेला व्हिडीओ अभिजीत चव्हाण यांनी शेअर केला आहे. हा व्हिडीओ शेअर करत त्यांनी लिहिलंय, मफमाझ्या मृत्यूची बातमी मला पाहायला मिळाली. अजून काय पाहिजे. आता काय करायचं ह्यांचं?फफ

अभिजीत चव्हाण यांनी पोस्ट शेअर केल्यानंतर त्याखाली त्याच्या चाहत्यांनी कमेंट करत लिहिलेय, मफकेस करायला हवी त्या शिवाय ही लोक सुधारणार नाहीत.फफ दुसऱ्याने लिहिलेय, मफकारवाई करा.. आणि तुझे आयुष्य वाढले बाबा.फफ आणखी एकाने लिहिलेय, मफदेवा काय मूर्ख माणसे आहेत. जिवंत माणसाला मारतात.फफ

अभिजीत चव्हाण यांच्या वर्कफ्रंटबद्दल सांगायचं झाल्यास, त्यांचा मइन्स्पेक्टर झेंडेफ हा सिनेमा नुकताच रिलीज झाला आहे. या सिनेमात एका गाण्यामध्ये त्यांची एन्ट्री दाखवण्यात आली आहे. त्याचप्रमाणे सुंदर मी होणार या नाटकात ते संस्थानिक महाराज ही भूमिका साकारत आहेत.

## लगे रहो मुन्ना भाई सिनेमात महात्मा गांधींची भूमिका मराठमोळ्या अभिनेत्याने साकारली होती



मुंबई-'लगे रहो मुन्ना भाई' हा राजकुमार हिरानी दिग्दर्शित चित्रपट २००६ साली प्रदर्शित झाला. हा चित्रपट केवळ म नोरंजनापुरता मर्यादित न राहता समाजाला एक महत्त्वपूर्ण संदेश देऊन गेला. महात्मा गांधींच्या विचारांना विनोदी पण भावपूर्ण पद्धतीने मांडणारा हा चित्रपट प्रेक्षकांच्या मनाला भिडला. 'गांधिगिरी' ही संकल्पना लोकांपर्यंत पोहोचवण्याचे मोठे कार्य या चित्रपटाने केले.

चित्रपटाची कथा मुंबईत राहणाऱ्या मुन्ना उर्फ मुरली प्रसाद शर्मा आणि त्याचा साथीदार सर्किट यांच्या भोवती फिरते. मुन्ना हा गुंडगिरी करणारा, पण मनाने चांगला माणूस असतो. एका रेडिओ जॉकीच्या प्रेमात तो पडतो आणि तिच्या प्रभावाखाली तो गांधीजींबाबत जाणून घेण्यासाठी तो पुस्तकं वा-चतो. याच दरम्यान त्याला गांधीजींचा आत्मा भासतो आणि त्यांच्याकडून तो खऱ्या अर्थाने अहिंसा, सत्य, संयम आणि क्षमाशीलतेचे धडे शिकतो. हीच शिकवण पुढे त्याच्या आयुष्यातील आणि इतरांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी उपयोगी ठरते.

या चित्रपटाची खासियत म्हणजे तो उपदेश न करता सहजतेने गांधीवाद मांडतो. प्रेक्षकांना हसवता हसवता तो त्यांना विचार करायलाही लावतो. 'गांधिगिरी' हा शब्द प्रेक्षकांच्या आयुष्यात इतका रुजला की अनेकांनी प्रत्यक्षात आपले वर्तन बदलले. राजकारण, समाज आणि दैनंदिन आयुष्यात वाद न मांडता संवाद साधण्याचा आणि संयमाने समस्यांचे निराकरण करण्याचा संदेश या चित्रपटातून मिळतो.

दरम्यान, या सिनेमातील महात्मा गांधींची भूमिका देखील अतिशय महत्त्वाची होती. लगे रहो मुन्ना भाईमध्ये महत्त्मा गांधी यांची भूमिका अभिनेते दिलीप प्रभावळकर यांनी साकारली होती. विशेष म्हणजे शूटिंग संपल्यानंतर दिलीप प्रभावळकर मेकअप शिवाय संजय दत्तसमोर आले तेव्हा संजय दत्तने त्यांना ओळखलं देखील नव्हते.चित्रपटातील संजय दत्तने साकारलेला मुन्ना आणि अरशद वारसीचा सर्किट हे पात्र अतिशय प्रभावी ठरले. विद्या बालन हिने रेडिओ जॉकीची भूमिका अप्रतिम साकारली. गांधीजींची भूमिका दिलीप प्रभावळकर यांनी केली असून त्यांच्या सहज वावरामुळे प्रेक्षकांना खऱ्या गांधीजींचा भास होतो. संगीत, विनोदी प्रसंग, भावनिक क्षण आणि ताकदीची पटकथा यामुळे चित्रपटाला अपार यश मिळाले.

## बॅटल ऑफ गलवान चित्रपटातील सलमान खानचा फर्स्ट लूक आला समोर

मुंबई-मसिकंदरफ चित्रपटाच्या फ्लॉपनंतर सलमान खान मबॅटल ऑफ गलवानफ चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यग्र आहे. चित्रपटाचं शूटिंग नुकतेच सुरू झालं आहे. काल सलमान खान आणि चित्रपटाची मुख्य अभिनेत्री चित्रांगदा सिंग शूटिंगसाठी लेह-लडाखला पोहोचले आणि आज ९ सप्टेंबर रोजी मबॅटल ऑफ गलवानफमधील सलमान खानच्या लूकची पहिली झलक समोर आली आहे. आज ९ सप्टेंबर रोजी मभाईजानफनं त्याच्या इंस्टाग्राम अकाउंटवर आगामी चित्रपटाच्या सेटवरून एक नवीन फोटो शेअर केला आहे,आता फोटो पाहून असं दिसत आहे की, चित्रपट ब्लॉकबस्टर ठरेल, असा अंदाज सोशल मीडियावर चाहते लावत आहेत.

सेटवरील सलमान खानचा फोटो : मबॅटल ऑफ गलवानफमधील सलमान खानच्या चेहऱ्याच्या लूकची पहिली झलक पाहून त्याच्या चाहत्यांची चित्रपटाबद्दलची उत्सुकता वाढली आहे. सलमानचा चेहरा क्लॅप बोर्डच्या मागे आहे आणि त्यावर मसीन नंबर ८६फ, मशॉट नंबर १फ आणि मटेक नंबर १फ असं लिहिलं आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या फोटोमध्ये सलमान आर्मी जॅकेटमध्ये असल्याचा दिसत आहे. त्याच्या चेहऱ्यावर जखमा आहे. सलमान खाननं हा फोटो शेअर करत लिहिलं आहे की,फबॅटल ऑफ गलवान.फ आता या पोस्टला अनेक चाहते लाईक करत आहेत. याशिवाय कमेंट बॉक्समध्ये लोक प्रतिक्रिया देऊन सलम ानचं कौतुक करत आहेत. सोशल मीडियावर अनेक चाहत्यांनी या चित्रपटाला ब्लॉकबस्टरचा टॅग दिला आहे.

मबॅटल ऑफ गलवानफ चित्रपटाबद्दल : या चित्रपटाचं दिग्दर्शन अपूर्व लाखिया करत आहेत. याआधी त्यांनी मशूटआउटफ आणि मलोखंडवालाफ, महसीना पार्करफ, मएक अजनबीफ आणि ममिशन इस्तंबूलफ सारखे चित्रपट दिग्दर्शित केले आहेत. सलमान खानबरोबर तो पहिल्यांदाच चित्रपट करणार आहे. दरम्यान मबॅटल ऑफ गलवानफ चित्रपटाबद्दल सांगायचे झाले तर चित्रांगदा सिंह ही मुख्य भूमिकेत दिसणार आहे. हा चित्रपट कधी प्रदर्शित होईल याची माहिती अद्याप समोर आलेली नाही. तसेच सलमानच्या वर्कफ्रंटबद्दल सांगायचे झाले तर तो पुढे मकिक २फ, मदबंग ४फ आणि बाकी अनेक चित्रपटांमध्ये दिसणार आहे.




## अक्षयकुमार धमाल करण्यासाठी सज्ज...


मुंबई,९ सप्टेंबर बॉलिवूड 'खिलाडी' अक्षय कुमार ९ सप्टेंबर रोजी आप-ला वाढदिवस साजरा करत आहे. त्यानं आज बॉलिवूडमध्ये ३४ वर्षे पूर्ण केली आहेत. या खास प्रसंगी चाहते आणि बॉलिवूडमधील स्टार्स त्याच्यावर प्रेमाचा वर्षाव करत आहेत. अक्षय कुमार आज ५८ वर्षाचा झाला आहे. आज आम्ही तुम्हाला अक्षयच्या आगामी कॉमेडी चित्रपटाबद्दल काही माहिती देणार आहोत.

१ 'जॉली एलएलबी ३' : 'जॉली एलएलबी ३' हा चित्रपट १९ सप्टेंबर २०२५ रोजी रिलीज होणार आहे. या चित्रपटाचं दिग्दर्शन सुभाष कपूर यांनी केलं आहे. या चित्रपटामध्ये मुख्य भूमिकेत अक्षय कुमार, अर्शद वारसी आणि सौरभ शुक्ला यांच्यासह अमृता राव, हुमा कुरेशी, बोमन इराणी आणि अन्नू कपूर हे स्टार्स दिसणार आहेत. सध्या हा चित्रपट वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे.

२ 'वेलकम टू द जंगल' : अभिनेता अक्षय कुमारचा कॉमेडी चित्रपट 'वेलकम टू जंगल' हा देखील लवकरच चाहत्यांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटामध्ये अक्षय व्यतिरिक्त संजय दत्त, सुनील शेट्टी, अर्शद वारसी, परेश रावल, जॉनी लीव्हर, कृष्णा अभिषेक, राजपाल यादव, तुषार कपूर, दलेर मेहंदी, श्रेयस तळपदे, किकू शारदा, मिका सिंग, राहुल देव, मुकेश तिवारी, शारीब हाश्मी, इनामूलहक्क, कृष्णा अभिषेक, झाकीर हुसैन, यशपाल शर्मा, रवीना टंडन, लारा दत्ता, जॅकलीन फर्नाडिस, दिशा पटानी आणि वृही कोडवारा हे स्टार्स दिसणार आहेत. तसेच या चित्रपटाचं दिग्दर्शन अहमद खान करणार आहे. हा चित्रपट आधी २४ डिसेंबर २०२४ रोजी रिलीज होणार होता. आता हा २०२५ रोजी रिलीज होईल.

३ 'भूत बंगला' : अक्षय कुमारचा 'भूत बंगला' चित्रपट देखील खूप चर्चेत आहे. हा चित्रपट २ एप्रिल २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे. प्रियदर्शन दिग्दर्शित हा चित्रपट भयपट आणि हास्याचे मिश्रण आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून १४ वर्षानंतर अक्षय हा दिग्दर्शक प्रियदर्शनबरोबर काम करणार आहे. त्याचे प्रियदर्शनबरोबरचे मागील चित्रपट 'हेरा फेरी' आणि 'भूल भुलैया' हे होते. हे दोन्ही चित्रपट सुपरहिट ठरले आहेत.

४ 'हेरा फेरी ३' : अक्षय कुमार, परेश रावल आणि सुनील शेट्टी अभिनीत 'हेरा फेरी ३' हा चित्रपट प्रेक्षकांना लवकरच पाहायला मिळणार आहे. या चित्रपटामध्ये श्याम, राजू आणि बाबुराव हे त्रिकूट दिसेल. या चित्रपटाचं दिग्दर्शन प्रियदर्शन करणार आहे. या चित्रपटामध्ये पुन्हा एकदा प्रेक्षकांना खळखळून हसायला मिळेल. आता प्रेक्षक 'हेरा फेरी ३'ची बऱ्याच काळापासून वाट पाहत आहेत. या चित्रपटाची रिलीज तारीख निश्चित झालेली नाही.



# आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी लातूर क्रेडाईचे पदाधिकारी सिंगापूरला रवाना, बांधकाम क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञान व संशोधनावर होणार चर्चा

**लातूर/प्रतिनिधी :** राष्ट्रीय क्रेडाईच्या वतीने दरवर्षी आयोजित केली जाणारी आंतरराष्ट्रीय परिषद यावर्षी सिंगापूर येथे होणार आहे. ही परिषद ११, १२ व १३ सप्टेंबर या तारखांना आयोजित करण्यात आली असून त्यासाठी क्रेडाई लातूरचे पदाधिकारी रवाना झाले आहेत.

या परिषदेत बांधकाम क्षेत्रातील विविध विषयांवर चर्चा होणार असून याविषयी मोलाचे मार्गदर्शनही होणार आहे. या आंतरराष्ट्रीय परिषदेत राष्ट्रीय क्रेडाईचे रिसर्च अँण्ड डेवलपमेंट कमिटी सदस्य धर्मवीर भारती, क्रेडाई लातूरचे अध्यक्ष उदय पाटील, चेअरमन जगदीश कुलकर्णी, प्रेसिडेंट इलेक्ट संतोष हत्ते, सेक्रेटरी विष्णु मदने, उपाध्यक्ष अमोल मुळे यासह इतर पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. या परिषदेद्वारे बांधकाम क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञान, संशोधन आणि समस्या यावर चर्चा होईल. तसेच जागतिक स्तरावरील बदलांसाठी मार्गदर्शन मिळवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे, असे क्रेडाई लातूरच्या पदाधिकाऱ्यांनी नमूद केले आहे.

# राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत केशवराजच्या विद्यार्थ्यांचे यश




**लातूर/प्रतिनिधी :** मातृमंदिर विश्वस्त संस्था निगडी, पुणेद्वारा राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत श्री केशवराज माध्यमिक विद्यालयातील तीन विद्यार्थ्यांनी यश मिळवून उत्तेजनार्थ पारितोषिके प्राप्त केली आहेत.

या स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातील विविध शाळांमधून ११५१ विद्यार्थ्यांनी निबंध पाठवले होते. त्यामध्ये श्री केशवराज माध्यमिक विद्यालयातील ५५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यातील कु. समीक्षा संजय गलांडे या विद्यार्थिनीने युवांच्या देशातील युवांची जबाबदारी, कु. कल्याणी मनोजराव देशपांडे या विद्यार्थिनीने उद्योगरत्न – रतन टाटा, तसेच इंग्रजी भाषेमधून चि. अलोक व्यंकटेश शेंडगे याने या विषयांवर निबंध लिहिले होते. या विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त झाले.

या विद्यार्थ्यांना दि. ११ सप्टेंबर २०२५ रोजी मनोहर सभागृह, ज्ञान प्रबोधिनी निगडी, पुणे येथे प्रसिद्ध साहित्यिक श्री न.म. जोशी यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. यात या विद्यार्थ्यांना रोख रक्कम आणि प्रमाणपत्र देण्यात आले. या स्पर्धेसाठी निबंधलेखन विभाग प्रमुख श्री प्रल्हाद माले सहाय्यक श्री अमोल गायकवाड यांनी परिश्रम घेतले. या सर्व यशस्वी स्पर्धकांचे, भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य मा.श्री प्रवीण सरदेशमुख,मा.श्री संजय गुरव, स्थानिक समन्वय समिती अध्यक्ष मा. श्री धनंजय तुंगीकर, कार्यवाह मा. श्री शैलेश कुलकर्णी, शालेय समिती अध्यक्ष मा. श्री गंगाधर खेडकर, विद्यालयाचे मुख्याध्यापक मा. श्री बालासाहेब केंद्रे, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक मा. श्री महेश कस्तुरे, पर्यवेक्षिका श्रीमती राजश्री कुलकर्णी, श्रीमती इंदू ठाकूर, श्रीमती अंजली निर्मळे, पर्यवेक्षक श्री राम जोशी, श्री धनंजय कुलकर्णी तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या राज्यातील सर्व लाभार्थ्यांना सीएससी (कॉमन सर्व्हीस सेंटर केंद्रा)मधून मिळणार माफक दरात सेवा

**लातूर/धाराशिव प्रतिनिधी :** अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या लाभार्थ्यांना आता सीएससी केंद्रामधून कॉमन सेव्हीस सेंटर महामंडळाच्या योजनांचा लाभ माफक दरात घेता येणार आहे. याबाबतचा सामजस्य करार एमओयु महामंडळाच्या मुख्य कार्यालयामध्ये महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजयसिंह देशमुख व सीएससी केंद्राचे प्रमुख वैभव देशपांडे याच्या उपस्थितीत करण्यात आला आहे. या करारानुसार, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे लाभार्थी आता त्याच्या जवळच्या कोणत्याही सीएससी केंद्रावर जावून महामंडळाच्या योजनांचा लाभ कमी दरात घेऊ शकतील. यामध्ये महामंडळाच्या योजनांसाठी ऑनलाईन अर्ज भरणे, कागदपत्रे अपलोड करणे, योजनेची सद्यस्थिती तपासणे आणि आवश्यक मार्गदर्शन मिळवणे यासारख्या सुविधांचा समावेश आहे.

सीएससी केंद्र हे ग्रामीण भागातील नागरिकांसाठी विविध सरकारी आणि खासगी सेवा पुरवण्याचे महत्वाचे माध्यम आहे. महामंडळाने सीएससी केंद्रासमवेत केलेल्या करारामुळे महामंडळाच्या लाभार्थ्यांना योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्याच्या ठिकाणी जाण्याची गरज भासणार नाही, त्यामुळे त्यांचा वेळ आणि पैसा वाचेल. महामंडळाचे अध्यक्ष म्हणाले, ‘‘या करारामुळे आमची उद्दिष्टे अधिक प्रभावीपणे पूर्ण होतील. राज्याच्या कानाकोपऱ्यात असलेल्या गरजू आणि पात्र तरुणापर्यंत महामंडळाच्या योजना पोचणार आहेत. कमी खर्चात आणि त्यांच्या घराजवळच त्याना आवश्यक सेवा मिळाल्यामुळे त्यांना स्वंयरोजगारासाठी प्रोत्साहित करुन मराठा समाजातील तरुणांना उद्योजक करण्याचे महामंडळाचा उद्देश पुर्णत्वास नेणे सोपे होईल.‘‘ राज्यामध्ये सीएसी थे ७२ हजार पेक्षा जास्त केंद्र कार्यरत असल्याने त्यांच्या माध्यमातून अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या लाभार्थ्यांना त्याच्या गावातूनच पात्रता प्रमाणपत्र कागदपत्र, बँकेचे कर्ज मजुरी बैंकेचा हप्ता अपलोड करण्यासाठी प्रायेकी ७० रुपये शुल्क आकारण्यात येणार असल्याची माहिती महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक विजयसिंह देशमुख यानी दिली. या करारामुळे लाभार्थ्यांचा वेळ वाचणार आहे, आणि त्यांना जिल्ह्याच्या विकाणी जाण्याची गरज लागणार नाही. ग्रामीण भागातील उद्योजकतेला बालना मिळेल.‘‘ यामुळे सद्यस्थितीत महामंडळाच्या नावाखाली लाभार्थ्यांकडून पैसे उकलणाऱ्या अनधिकृत एजंट लोकांना आळा घालणे शक्य होईल, भविष्यात लाभार्थ्यांसाठी महामंडळाचे मोबाईल ॲप व चॅट बॉट सारख्या सुविधा देखील उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

या नवीन उपक्रमामुळे महामंडळाच्या योजनांचा लाभ घेण्याची प्रक्रिया अधिक सोपी, पारदर्शक आणि किफायतशीर होईल असे मत महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांनी व्यक्त केले.

# आरक्षणप्रश्नी कोणत्याही तरुणांनी टोकाचे पाऊल उचलू नये – आ. रमेशआप्पा कराड

## वांगदरी येथील भरत कराड यांच्या कुटुंबीयांचे आमदार कराड यांच्याकडून सांत्वन





**लातूर/प्रतिनिधी :** ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी अनेक नेते लढत आहेत तेव्हा आरक्षणाच्या प्रश्ना संदर्भात कोणत्याही तरुणांनी टोकाचे पाऊल उचलू नये आत्महत्या सारख्या घटनेचा मार्ग स्वीकारू नये असे आवाहन लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी वांगदरी येथे बोलताना केले.

रेणापूर तालुक्यातील मौजे वांगदरी येथील भरत महादेव कराड या तरुणाने ओबीसीचे आरक्षण संपत आल्याच्या भीतीने मांजरा नदीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना नुकतीच घडली सदर घटना समजल्याने लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी शुक्रवारी सकाळी वांगदरी येथे जाऊन भरत कराड यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन धीर दिला. या प्रसंगी राज्याचे अन्न व पुरवठा मंत्री मा. छगनराव भुजबळ, माजी कृषिमंत्री आ धनंजय मुंडे यांनीही कराड कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले. यावेळी मयत भरत यांचे वडील महादेव कराड, आई गिरिजाबाई, पत्नी, भाऊ आणि मुले होते. याप्रसंगी वांगदरी आणि परिसरातील ओबीसी बांधव ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित नागरिकांतून अमर रहे अमर रहे भरत कराड अमर रहे, एकच पर्व ओबीसी सर्व, न्याय न्याय द्या ओबीसींना न्याय द्या अशा घोषणा देण्यात येत होत्या.

उपस्थितांशी संवाद साधताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, मराठा आरक्षण संदर्भात शासनाच्या जीआर नंतर ओबीसी समाजात संताप व्यक्त होत असून आरक्षण संपल्याच्या भीतीने अत्यंत गरीब कुटुंबातील ऑटोचालक भरत कराड या तरुणाने आत्महत्या केली. ही घटना अत्यंत दुर्दैवी असून ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी समाजातील अनेक ज्येष्ठ नेते लढत आहेत. त्यामुळे आत्महत्या सारखे टोकाचे पाऊल कोणत्याही तरुणांनी उचलू नये शासन आपल्या सोबत आहे. मयत भरत कराड यांच्या मुलांच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी मी स्वतः घेत असल्याचे यावेळी आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखवले.

यावेळी विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी, ओबीसी समाजाचे नवनाथ वाघमारे, भागवत सोट, सतीश आंबेकर, विजय गंभीरे, मनोज कराड, विजय काळे, नागनाथ कराड, बाबासाहेब घुले, बालासाहेब शेप, अभिषेक आकनगिरे, अनिल गोयकर, सुभाष राऊत, दत्ता शेप, गणेश केंद्रे, संजय गंभीरे, प्रमोद भांगे, शेषराव कराड, जयद्रथ कराड, संजय डोंगरे, राजाभाऊ हाके पाटील, बंडू मुंडे, विनोद आंबेकर, रमेश लहाडे, नरेश चपटे, दत्ता सरवदे, अनुसया फड, राम भताने, लक्ष्मण खलंग्रे, राजू जटाळ, पिंटू डोंगरे यांच्यासह असंख्यजण होते.

# भारतीय सशस्त्र सैन्यदलामध्ये अधिकारी पदाच्या पूर्व प्रशिक्षणाची सुवर्णसंधी

**लातूर/प्रतिनिधी :** भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना Service Selection Board (SSB) या परीक्षेची पूर्व तयारी घेणेसाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड , नाशिक येथे महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्रातील नवयुवक व नवयुवतीसाठी दिनांक २२ सप्टेंबर २०२५ ते ०१ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत SSB कोर्स क्र. ६२ आयोजित करण्यात येत आहे. कोर्स कालावधीत प्रशिक्षणार्थींना नि:शुल्क प्रशिक्षण, निवास व भोजन दिले जाते.

लातूर जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी सैन्य दलातील अधिकारी पदाची संधी उपभोगण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कर्यालय, लातुर येथे दिनांक १६ सप्टेंबर २०२५ रोजी मुलाखतीस हजर रहावे. मुलाखतीस येतेवेळी त्यांनी Department of Sainik Welfare, Pune (DSW) यांच्या वेबसाईट वर सर्च करुन त्यामधील SSB-62 कोर्ससाठी (किंवा संबंधीत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने प्रिंट दिलेल्या) प्रवेशपत्र अ त्यासोबत असलेली परिशिष्टंची प्रिंट घेऊन व ते पुर्ण भरुन सोबत घेऊन यावे.

सदर एस. एस. बी.वर्गामध्ये प्रवेश मिळण्यासाठी खाली नमूद कोणतीही एक पात्रता असणे आवशयक आहे व त्यासंबधीचे पात्रता प्रमाणपत्र प्रशिक्षण वर्गाला येताना सोबत घेऊन यावेत. कंम्बाईड डिफेन्स सर्व्हीसेस एक्झामिनेशन (CDSE-UPSC) अथवा नॅशनल डिफेन्स ॲकेडमी एक्झामिनेशन (NDA-UPSC) पास झालेली असावी व त्यासाठी सर्व्हीसेस सिलेक्श्न बोर्ड मुलाखतीसाठी पात्र झालेले असावे.एनसीसी ‘सी’ सर्टिफिकेट (‘ए’ किंवा ‘बी’ ग्रेड मध्ये पास झालेले असावेत व एनसीसी ग्रुप हेडक्वार्ट्रने एसएसबी साठी शिफारस केलेली असावी. टेक्नीकल ग्रॅज्युएट कोर्ससाठी एस.एस.बी. मुलाखतीसाठी कॉल लेटर असावे. विद्यापीठ प्रवेश प्रणाली (University Entry Scheme) साठी एस.एस.बी कॉल लेटर असावे किंवा एसएसबी साठी शिफारस केलेल्या यादीत नांव असावे.

अधिक माहीतीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांचा ईमेल आय डी : training.pctcnashikgmail.com व दुरध्वनी क्र. ०२५३-२४५१०३२ किंवा व्हाट्सप क्र. ९१५६०७३३०६ वर कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अथवा दुरध्वनीवर संपर्क करावा असे आवाहन ले. कर्नल शरद प्रकाश पांढरे (नि.) जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, लातूर यांनी केले आहे.

# मालमत्ताधारकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन तडजोडीअंति थकीत कर भरणा करावा – आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी यांचे आवाहन




**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील अद्यापही काही थकबाकीदार आपला मालमत्ता कर भरण्यास टाळाटाळ करीत असल्याने कर संकलन व कर आकारणी विभागाणे वसुलीची धडक मोहीम राबवित आहे. तसेच मालमत्ताकराची व पाणी पट्टी कराची थकबाकी मोठया प्रमाणात वसूल होणे बाकी असल्याने सदरील प्रकरणे राष्ट्रीय लोक अदालात मध्ये ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार दिं.१३ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० ते सांय. ५.०० वा.पर्यंत लातूर महानगरपालिका,मुख्य कार्यालय लातूर येथे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या वतीने राष्ट्रीय लोकअदालत चे आयोजन करण्यात आले आहे.

सदर लोक अदालतमध्ये मालमत्ताकर वसूलीची वादपुर्व प्रकरणे तडजोडीअंती निकाली काढण्यात येणार असल्याने, थकबाकीदार मालमत्ताधारकांनी या सुवर्ण संधीचा लाभ घेवुन आपल्याकडे देय असलेल्या मालमत्ताकराची व पाणी पट्टी कराच्या थकीत रक्कमेचा एकरक्कमी भरणा करून या सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी यांनी केले आहे.

# सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते अहमदपूरात रविवारी जम्बो विकास कामाचे भूमिपूजन

**अहमदपूर/प्रतिनिधी :** राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांच्या प्रयत्नातून अहमदपूर शहरातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत विविध प्रभागासाठी मंजूर करण्यात आलेल्या तब्बल ४ कोटी २० लक्ष रुपयाचा विकास कामाचा शुभारंभ अहमदपूर शहरात दि. १४ सप्टेंबर रोज रवीवार रोजी सकाळी १०:०० वाजल्यापासून सायंकाळी ४ वाजेपर्यंत राज्याचे सहकार मंत्री तथा गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे. या कार्यक्रमासाठी उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे, मुख्यधिकारी संतोष लोमटे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता गोविंद भोसले यांसह विविध मान्यवरांची उपस्थिती असणार आहे.

# साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्रात विद्यार्थ्यांनी आपली क्षमता सिद्ध करावी – साहित्यिक विवेक सौताडेकर



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शिक्षणाची पंढरी असून लातूरचा शैक्षणिक पॅटर्न हा महाराष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण देशाला सुपरिचित आहे.या लातूरच्या शैक्षणिक पॅटर्नमध्ये दयानंद शिक्षण संस्था व दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर आपली छाप पाडलेली आहे.विद्यार्थ्यांनी साहित्य,संगीत,कला,नृत्य,क्रीडा, चित्रकला,गायन,वादन,नाटक आणि विज्ञान अशा विविधांगी क्षेत्रात आपल्यातल्या सुप्त कलागुणांना वाव देत जीवनाची वाटचाल केली पाहिजे. जीवनात अनेक संधी येतात,त्या संधीचे सोने केले पाहिजे.वेळप्रसंगी संधी येत नसेल तर त्या संधीला खेचूनही आणता आले पाहिजे.विद्यार्थीदशेतच गुरुकडून मिळालेल्या ज्ञानाची शिदोरी व प्रेरणादायी धडे घेऊन अभ्यासक्रमाबरोबर साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्रात आपले नावलौकिक केले पाहिजे. स्वतःची क्षमता सिद्ध करीत एक उत्तम साहित्यिक, नाटककार,चित्रकार,गायक, नृत्यकार,संगीतकार बनले पाहिजे.मराठी सिनेमासृष्टीतील ललिता पवार,मकरंद अनासपुरे,रितेश देशमुख यासारख्या कलावंतांचा आदर्श घेतला पाहिजे. जीवन हे एक नाटक आहे,या नाटकाच्या रंगमंचावरील आपण सर्वजण पात्र आहोत. जीवनात एक उत्तम कलावंत बनले पाहिजे.लातूरचा वसा आणि वारसा जपत एक दिग्गज साहित्यिक,वैज्ञानिक आणि संशोधक बनले पाहिजे,असे प्रतिपादन लातूर येथील प्रसिद्ध साहित्यिक विवेक सौताडेकर यांनी केले.

येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.११ सप्टेंबर २०२५ रोजी साहित्य आणि सांस्कृतिक मंडळा चे उद्घाटन झाले.यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे होते.याप्रसंगी साहित्य आणि सांस्कृतिक मंडळाच्या प्रभारी प्रा. मेघा पंडित,आयक्यूएसी समन्वयक डॉ.जमन अंगुलवार,प्रा.बळवंत सूर्यवंशी,मंडळातील डॉ.चंद्रशेखर स्वामी,डॉ.गजानन बने,डॉ. विजेंद्र चौधरी,डॉ.रामशेट्टी शेटकार, मंडळ अध्यक्ष पर्णवी ढवारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षीय समारोप करताना प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे असे म्हणाले की,विद्यार्थी केंद्रबिंदू मानून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून विविध मंडळाच्या माध्यमातून विद्यार्थी घडवण्याचा प्रयत्न महाविद्यालयात सातत्याने केला जातो. दयानंद विज्ञानचे विद्यार्थी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत,आविष्कार स्पर्धा,क्रीडा स्पर्धा,विज्ञान,साहित्य,संगीत,कला आणि युवक महोत्सव अशा सर्वांगीण क्षेत्रात चमकतात.विद्यार्थ्यांनी जीवनात परिवर्तन घडविले पाहिजे.विद्यार्थी पेटला की आपोआप क्रांती घडते.म्हणूनच विद्यार्थ्यांनी साहित्य,संगीत,कला अशा अनेक क्षेत्रात क्रांती घडविली पाहिजे.

प्रास्ताविक मंडळाची अध्यक्ष पर्णवी ढवारे यांनी केले तर आभार वेदांती वाघे या विद्यार्थीनीने मानले.सूत्रसंचालन व प्रमुख पाहुण्यांचा परिचय अजित गुजर व सायली पंडित यांनी संयुक्तरित्या केले.यावेळी ऋतुजा उगिले या विद्यार्थीनीने तयार केलेले हॅन्ड मेड पोस्टर प्रमुख पाहुण्यांना दिले.याप्रसंगी डॉ.रोहिणी शिंदे,डॉ.मनीषा गुरमे,प्रा.राहुल जाधव यांच्यासह मंडळातील आर्यन गिरवलकर, मधुरा धानोरकर, निकिता पाटील, आशिष भुसणीकर, तनुजा साळुंके, विना भंडारी, मुंडे परमेश्वर, प्रज्वल लामतूरे, सफा खान,अंजली शिंदे सर्व पदाधिकारी तसेच इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.

शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# सेवाकार्याचा लातूर पॅटर्न निर्माण करावा

## शहर जिल्हा भाजपा कार्यशाळेत संघटन मंत्री संजय कौडगे यांचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनानिमित्त दिनांक १७ सप्टेंबर ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीपर्यंत म्हणजेच २ ऑक्टोबर यादरम्यान देशभरात भाजपच्या वतीने सेवा पंधरवाडा आयोजित करण्यात येत आहे. या सेवा पंधरवाड्यात विविध कार्यक्रम होणार असून यामध्ये सेवा परमो धर्म या विचारांना पुढे नेत शहर जिल्हा भाजपाने सेवाकार्याचा लातूर पॅटर्न निर्माण करावा असे आवाहन मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगे यांनी केले.

सेवा पंधरवाड्यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या शहर जिल्हा भाजपा पदाधिकाऱ्यांच्या कार्यशाळेत मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगे बोलत होते. यावेळी माजी पालकमंत्री आ.संभाजी पाटील निलंगेकर, अभियानाच्या प्रदेश सहसंयोजिका प्रेरणा होनराव, शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, अर्चना पाटील चाकूरकर, माजी शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे यांच्यासह अभियानाचे शहर जिल्हा संयोजक अमोल गीते, सहसंयोजक संजय गिर, रविशंकर लवटे आदींची प्रमुख उपस्थिती होती.



सत्ता हे सेवेचे साधन असून सत्तेच्या माध्यमातून सेवाकार्य करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजातील प्रत्येक घटकासाठी अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्याचे सांगत संजय कौडगे यांनी सांगितले की, गेल्या काही वर्षांपासून हे सेवाकार्य अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी भाजपच्या वतीने राष्ट्रनेता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनापासून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीपर्यंत म्हणजेच १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर यादरम्यान सेवा पंधरवाड्याचे आयोजन करण्यात येत आहे. हा सेवा पंधरवाडा लातूर शहर भाजपच्या वतीने अधिक जोमाने आणि उत्साहाने पार पडून या पंधरवड्यात लातूर शहरातील जास्तीत जास्त जनतेपर्यंत पोहचत त्यांना वेगवेगळ्या सेवा देत सेवाकार्याचा लातूर पॅटर्न निर्माण करावा असे आवाहन मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगे यांनी केले.

लातूर भाजपने यापुर्वीही अनेक अभियाने यशस्वी करत या अभियानांमध्ये अधिकाधिक लोकसहभाग करून घेतला असल्याचे सांगत माजी पालकमंत्री आ.संभाजी पाटील निलंगेकर म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे केवळ देशातीलच नव्हे तर जगातील लोकप्रिय नेते असल्याचे सांगितले. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेले सेवा पंधरवाड्याचे अभियान लातूर भाजपने तितकेच लोकप्रिय करून या पंधरवाड्यात या अभियानात आयोजित करण्यात आलेले सर्व कार्यक्रम यशस्वी करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. या सेवा पंधरवाड्याच्या माध्यमातून जनसेवा करण्याची मोठी संधी पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्यांना उपलब्ध झालेली असून या संधीचे सोने करण्यासाठी प्रत्येकांनी अथक परिश्रम करून आपले योगदान द्यावे असे आवाहन केले.

सेवा पंधरवाड्यानिमित्त विविध सेवाभावी उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगून अभियानाच्या प्रदेश सहसंयोजिका प्रेरणा होनराव यांनी पक्षाने जे जे कार्यक्रम घेण्यास सांगितले आहेत ते केवळ कार्यक्रम नसून ही आपल्या प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे सांगितले. या अभियानादरम्यान स्वच्छता अभियान, वृक्षारोपण (एक पेड मां के नाम), रक्तदान शिबीर, मोदी विकास मॅरेथॉन, दिव्यांग सन्मान, विकसित भारत चित्रकला स्पर्धा, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीवनावर आधारित पुस्तकांचे वितरण, प्रबुद्ध संमेलन आदि उपक्रमांचा समावेश राहणार असल्याचे सांगितले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जे विकसित भारताचे स्वप्न पाहिले आहे ते स्वप्न पुर्ण करणे ही आपल्या प्रत्येकाची जबाबदारी असून याकरिता पंतप्रधान मोदी यांचे मार्गदर्शन आपल्याला तितकेच आवश्यक असल्याचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात येणारे सेवा पंधरवाडा अभियान लातूर शहर भाजपासाठी अतिशय महत्वाचे आहे. या अभियानाच्या माध्यमातून अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचण्याची संधी प्राप्त होणार असून याचा फायदा आगामी होऊ घातलेल्या महानगरपालिका निवडणुकांसाठी मोठ्या प्रमाणात होणार आहे. या अभियानामुळे लोकांची सेवा करण्याची संधी प्राप्त होणार आहे. मात्र त्यांच्याशी संपर्क साधता येणार असून या माध्यमातून निवडणुकीच्या प्रचाराची एक फेरीही आपल्याला पुर्ण करता येणार आहे त्यामुळेच हे सेवा पंधरवाडा अभियान पक्ष पदाधिकाऱ्यांसह माजी व भावी नगरसेवकांसाठी संधी उपलब्ध करून देणारे आहे. या संधीचे सोने करण्यासाठी प्रत्येकाने अभियानाच्या यशस्वीतेसाठी सर्वोतपरी योगदान द्यावे असे आवाहन शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी केले.

या कार्यशाळेत मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगे यांना छत्रपती शिवाजी महाराज जीवन गौरव पुरस्कार घोषित झाल्याबद्दल शहर जिल्हा भाजपाच्या वतीने सत्कार करून त्यांचे अभिनंदन करण्यात आले. या कार्यशाळेचे सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन महिला मोर्चा अध्यक्षा रागिणी यादव यांनी केले. या कार्यशाळेत सरचिटणीस रवी सुडे, ॲड दिग्विजय काथवटे, मीना भोसले, प्रविण सावंत, युवा मोर्चा अध्यक्ष गणेश गोमचाळे, मंडल अध्यक्ष सुरेश जाधव, निर्मला कांबळे, राहूल भुतडा, रोहित पाटील, विशाल हावा पाटील, सचिन सुरवसे, अजय भुमकर, निखील गायकवाड, मोहसीन शेख, यांच्यासह पक्ष पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## पिंपळगाव येथील काँग्रेस कार्यकर्त्यांचा आ. कराड यांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात होत असलेल्या विविध विकास कामांना प्रेरित होऊन भाजपाचे नेते आ. श्री रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून लातूर तालुक्यातील मोजे पिंपळगाव आंबा येथील काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील गावागावात वाडीवस्तीत भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध विभागामार्फत सर्वांगीण विकासाच्या योजना राबवल्या जात असून वैयक्तिक लाभाच्या योजनेचा मोठ्या प्रमाणात गरजूंना लाभ मिळत आहे. एकूणच संपूर्ण मतदारसंघात विकास कामांना गती मिळाली आहे. होत असलेल्या कामांना प्रेरित होऊन लातूर तालुक्यातील मोजे पिंपळगाव आंबा येथील युवक काँग्रेसचे अध्यक्ष प्रशांत शेषराव पिसाळ, राजेसाहेब बाळासाहेब देशमुख, भुजंग अंबऋषी पिसाळ यांच्यासह इतर अनेकांनी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भारतीय जनता पार्टी जाहीर प्रवेश केला आहे.

यावेळी भाजपाचे भैरवनाथ पिसाळ, विजय पिसाळ, बापूराव बिडवे, प्रशांत शिंदे, अच्युत पिसाळ, रावस पिसाळ, मधुकर बिडवे, गहिनीनाथ नाळापुरे, दत्तात्रय पिसाळ, पांडुरंग पिसाळ, रामभाऊ पिसाळ यांच्यासह इतर अनेक जण उपस्थित होते.

### तोबा गर्दी ..

सणवारात अचानक
नेतोबांची तोबा गर्दी
थोडेफार जरीहीखरे
सहेतुक आली अर्धी

दारा पाशी इलेक्शन
मतदात्यां लावे नादी
सर्व पक्षीय जमलेले
भलीमोठी असेयादी

उत्सावा शिरेउत्साही
प्रत्येकाला प्रिय गादी
कधीसंपूर्ण लपाछपी
कधी स्पष्ट साळसुधी

जात धर्म नाही सिमा
असेसकला आझादी
फाटूनिनिघतो बुरखा
उघड होते सत्य कधी

हव्यासाची सवय जडे
लपवणारं कशीव्याधी
स्वच्छ राज कारणार्थ
कुठूनशोधावी औषधी

आपला त्रास इतरां हो
जाणवेना न गोष्टसाधी
वावर हवाय लक्ष वेधी
फक्तसरळ स्वार्थसाधी

उत्सवात मिसळापण
असोअंतर्मनात शुध्दी
पावित्र्य पाळी सणाचे
राज्यकर्ते जर मुत्सद्दी

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

## जिल्हा परिषदेच्या कृषि विभागामार्फत शेतकऱ्यांना कृषी औजारांसाठी अर्ज करण्यासाठी २२ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्हा परिषद, लातूर कृषि विभाग अंतर्गत सन २०२५-२६ मध्ये जिल्हा परिषद सेस फंडातून शेतकरी लाभार्थ्यांना कडबाकुट्टी सयंत्र (Chaffcutter), रुंद सरी वरंबा पेरणी यंत्र (Broad Bed Furrow Planter (BBF) व स्लरी फिल्टर (Slurry Filter) खरेदी करण्यासाठी डीबीटी तत्वावर अनुदान देण्यात येणार आहे. अर्ज करण्याची अंतिम मुदत १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत देण्यात आली होती. मात्र शेतकरी लाभार्थ्यांकडून अर्ज करण्याची मुदत वाढवून देण्याबाबत मागणी असल्यामुळे कृषीयंत्र या घटकांसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत २२ सप्टेंबर २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

जिल्हा परिषद लातूरच्या कृषि विभागाने सन २०२५-२६ या वर्षातील सेस निधीमधून शेतकऱ्यांसाठी कडबाकुट्टी, रुंद सरी वरंबा पेरणी यंत्र आणि स्लरी फिल्टर औजारांसाठी जिल्हा परिषद सेस फंडातून तरतूद करण्यात आली आहे. शेतकऱ्यांचा शेतीमधील खर्च कमी करून उत्पादन वाढवण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात येत आहे. या योजनेसाठी २९ ऑगस्टपासून अर्ज प्रक्रिया सुरू असून अर्ज करण्याची अंतिम मुदत २२ सप्टेंबर २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे. इच्छुक शेतकरी कृषि विभाग, पंचायत समिती कार्यालय येथे अर्ज सादर करू शकतात.

योजनेचे स्वरूप आणि लाभाचे स्वरूप

कडबाकुट्टी

एचपी (HP) कडबाकुट्टी: खरेदी किमतीच्या ५० टक्के किंवा जास्तीत जास्त १४ हजार रुपये, यापैकी जी रक्कम कमी असेल ती अनुदान म्हणून दिली जाईल.

५एचपी कडबाकुट्टी: खरेदी किमतीच्या ५० टक्के किंवा जास्तीत जास्त १७ हजार रुपये, यापैकी जी रक्कम कमी असेल ती अनुदान म्हणून दिली जाईल.

रुंद सरी वरंबा पेरणी यंत्र: खरेदी किमतीच्या ५० टक्के किंवा जास्तीत जास्त ३२ हजार ५०० रुपये, यापैकी जी रक्कम कमी असेल ती अनुदान म्हणून दिली जाईल.

स्लरी फिल्टर (टाकीसह): खरेदी किमतीच्या ५० टक्के किंवा जास्तीत जास्त २० हजार रुपये, यापैकी जी रक्कम कमी असेल ती अनुदान म्हणून दिली जाईल.

अर्ज प्रक्रिया आणि आवश्यक कागदपत्रे

या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी विहित नमुन्यातील अर्ज पंचायत समिती कार्यालयात किंवा जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. हे अर्ज भरून आवश्यक कागदपत्रांसह २२ सप्टेंबर,२०२५ पर्यंत संबंधित पंचायत समितीत कार्यालय येथे जमा करणे अनिवार्य आहे.

आवश्यक कागदपत्रे

विहित नमुन्यातील अर्ज, ७/१२ आणि ८ अ उतारा, अनुसूचित जाती किंवा जमातीच्या लाभार्थ्यांसाठी जातीचा दाखला, रुंद सरी वरंबा पेरणी यंत्रासाठी अर्जदाराच्या किंवा कुटुंबातील सदस्यांच्या नावावर ट्रॅक्टर असल्याचा पुरावा .

प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करून गटविकास अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पात्र लाभार्थ्यांची ज्येष्ठता सूची तयार केली जाईल या ज्येष्ठता सूचीनुसार पात्र लाभार्थ्यांना पूर्वसंमती दिल्यानंतर विहित मार्गाने लाभार्थ्याने खरेदी करून मोका तपासणी झाल्यानंतर लाभार्थ्यांच्या खात्यात थेट अनुदान (DBT) जमा करण्यात येईल.

जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी दिपक सुपेकर यांनी ग्रामीण भागातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.

संबंधित तालुका पंचायत समिती कार्यालयातील कृषि अधिकारी व विस्तार अधिकारी (कृषि) किंवा कृषि विभाग, जिल्हा परिषद, लातूर यांच्याशी संपर्क साधावा.

## द्वारकादास शामकुमार परिवाराच्यावतीने गुरुजनांचा सन्मान, निरुपण व संगीतमय कार्यक्रम : तुकाराम पाटील



**लातूर/प्रतिनिधी :** द्वारकादास शामकुमार परिवाराच्या वतीने शनिवार, दि. १३ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी चार वाजता लातुरात शिक्षक दिनाचे औचित्य साधून गुरुजनांचा सन्मान सोहळा तसेच ख्यातनाम व्याख्याते व प्रबोधनकार प्रा. गणेश शिंदे यांचे निरूपण आणि त्यांच्या सुविद्य पत्नी तथा महाराष्ट्राची महागायिका पुरस्कार प्राप्त गायिका सौ. सन्मिता धापटे - शिंदे यांचा गायनाचा एक वैचारिक, भक्तिमय अध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती द्वारकादास शामकुमारचे संचालक तुकाराम पाटील यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

द्वारकादास शामकुमार परिवाराच्या वतीने मागच्या सलग अकरा वर्षांपासून अशा प्रकारचा उपक्रम अविरतपणे राबविण्यात येत असल्याचे सांगून तुकाराम पाटील पुढे म्हणाले की, ज्या समाजाने आपल्याला भरभरून दिले आहे, त्या समाजाच्या ऋणातून उतराई होण्याचा हा छोटासा प्रयत्न म्हणून आपण सामाजिक उपक्रम राबवितो. द्वारकादास शामकुमार परिवाराची महाराष्ट्रात एकूण ८० शोरूम्स आहेत. त्यापैकी मराठवाड्यात २२ शोरूम असून मराठवाड्यातील सर्व शोरूममध्ये कामाची सुरुवात राष्ट्रगीताने होते. असा उपक्रम राबविणारे द्वारकादास शामकुमार हे राज्यातीलच नव्हे तर देशातील एकमेव कपड्यांचे शोरूम असावे, असेही त्यांनी बोलून दाखविले. आपल्या सर्वच शोरूममध्ये काम करणाऱ्या तरुणांना स्वतःच्या आई -वडिलांचा सांभाळ करणे क्रमप्राप्त केले आहे. आई - वडिलांना न सांभाळणाऱ्यांना आपण कामावरच ठेवत नसल्याचे त्यांनी स्पष्ट सांगितले.

आंतरराष्ट्रीय महिला दिन असो की डॉक्टर्स डे , प्रत्येक उपक्रमादिवशी त्या त्या क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान करण्याचे काम आपल्या परिवाराच्या माध्यमातून केले जाते . शिक्षक दिनानिमित्तही जास्तीत जास्त शिक्षक - शिक्षिकांचा सन्मान, गौरव करण्याचे काम शनिवारी केले जाणार आहे. समाजाच्या जडणघडणीत शिक्षकांचे योगदान अतुलनीय असे असते. प्रत्येक गुरुजनांचा सन्मान व्हावा, अशी आपली प्रांजळ भावना आहे. गुरुजनांच्या सन्मान सोहळ्यासोबतच प्रा. गणेश शिंदे यांच्या प्रबोधनात्मक किर्तन , प्रबोधनाचा कार्यक्रमही यावेळी होणार आहे. त्याचप्रमाणे कलर्स मराठीच्या सूर नवा - ध्यास नवा च्या विजेत्या सौ. सन्मिता धापटे - शिंदे यांच्या गीत गायनाचा ' मोगरा फुलला ' हा संगीतमय कार्यक्रमही यावेळी संपन्न होणार आहे. त्याचप्रमाणे द्वारकादास शामकुमार परिवाराच्या वतीने प्लास्टिक मुक्त महाराष्ट्र अभियान राज्यभर राबविण्यात येणार असून या कार्यक्रमाच्या अनुषंगाने २ लाख कापडी पिशव्यांचे मोफत वितरणही यावेळी करण्यात येणार आहे. शनिवारी सायंकाळी चार वाजता दयानंद सभागृहात होणाऱ्या या सोहळ्यास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहनही तुकाराम पाटील यांनी यावेळी केले.


**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-निविदा क्र. - ०४-२०२५-जीएसयू-इलेक्ट-जी**

सीपीएम, गति शक्ती, मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा.भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवीत आहे. **कामाचे नाव:** कलबुर्गी स्टेशनवर नवीन पिट लाईनच्या तरतूदीसंदर्भातील कामाचा इलेक्ट्रिकल जनरल सर्व्हिसेस भाग. (पुनर्निमंत्रण) **कामाची अंदाजे किंमत:** रु. १,७६,९६,८८४.३४/ **बयाणा रक्कम:** रु. २,३८,५००.००/- **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** १२ (बारा) महिने. **देखभाल कालावधी:** स्थापना सुरू केल्यापासून/हाती घेतल्यापासून १२ (बारा) महिने. **www.ireps.gov.in वेबसाइटवर निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ:** ०७.१०.२०२५ रोजी १५:०० वा. **www.ireps.gov.in** वर **निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ:** ०७.१०.२०२५ रोजी १५:३० वा. **वेबसाइट तपशील: www.ireps.gov.in. टीप:** संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येतो जेणेकरून **www.ireps.gov.in** या निविदा वेबसाइटसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धिपत्र लक्षात येईल.

**सीपीएम (जीएसयू) सीआर, सोलापूर** 66

रेल्वे फाटक को बंद स्थिति में पार करना मना है



**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**निविदा सूचना क्रमांक: GEM/2025/B/6658427 दिनांक १०.०९.२०२५**

डीआरएम(एम) चे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर, आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून सीलबंद निविदा मागवीत आहे. **स्थानासह कामाचे नाव:** सोलापूर विभागातील सोलापूर कोचिंग डेपो येथे कोचची यांत्रिकीकृत साफसफाई आणि डेपो परिसराच्या साफसफाईचे कंत्राट GeM द्वारे तीन वर्षांच्या कालावधीसाठी मनुष्यबळ आधारावर. **निविदा प्रणाली:** दोन पॅकेट प्रणाली. **कामाची अंदाजे किंमत:** रु. ९,६५,५९,६४९.५/- **निविदा फॉर्मची किंमत:** शून्य. **निविदा फॉर्म जिथून खरेदी करता येईल त्या कार्यालयाचा पत्ता:** डीआरएम(एम) चे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर. **जमा करावयाची बयाणा रक्कम:** रु. ६,३२,८००/- **कामाचा पूर्ण कालावधी:** काम सुरू झाल्यापासून तीन वर्षे. **निविदा सादर करण्याची तारीख आणि वेळ:** ०८.१०.२०२५ रोजी १०:०० वा. **निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ:** ०८.१०.२०२५ रोजी १०:३० वा. **वेबसाइट तपशील आणि सूचना ठिकाण जिथे निविदेची संपूर्ण माहिती पाहता येईल: www.gem.gov.in/**

**वरिष्ठ डीएमई/सोलापूर** 63

खतरनाक व विस्फोटक सामान के साथ यात्रा करना दंडनीय अपराध है



निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396



टोनर रिफिलिंग



फक्त ₹ ३००/-
मास्टर प्लेट
ड्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग



Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६